# मार्गदर्शक सूचना
# (२०२३-२४)

## केंद्र शासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना

Pradhan Mantri Formalisation of Micro Food Processing Enterprises (PMFME)

## वैयक्तिक उद्योजकांसाठी अर्थ सहाय्य सन २०२२-२३

## VOCAL FOR LOCAL

पार्श्वभूमी:-

१.१. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (MOFPI), भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या वतीने व राज्य सरकार यांचे भागिदारीने "आत्मनिर्भर भारत पॅकेज" अंतर्गत केंद्र शासन सहाय्यीत "प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना" (PMFME) सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत नवीन उदयोग स्थापन करणे तथा कार्यरत (MFPU) उदयोगाची स्तरवृध्दी करणे तसेच नुतनीकरण करणे इ. च्या दृष्टीने अशा उद्योगांना तांत्रिक, आर्थिक, **व्यवस्थापकीय** अर्थसाहय उपलब्ध करण्यात येणार आहे.

१.२. योजनेचे ध्येय: -

१.२.१. असंघटीत नवीन व कार्यरत अन्न प्रक्रिया उद्योगास औपचारिक स्वरुप प्राप्त करुन प्रोत्साहन देणे.

१.३. योजनेचे उद्देश: -

I. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांच्या स्तरवृद्धीसाठी भांडवली गुंतवणूक सहाय्य करणे आणि उद्योग आधार, वस्तू व सेवा कर (GST), FSSAI अंतर्गत स्वच्छता मानके नोंदणीसह त्यांना औपचारिक स्वरुप प्रदान करणे.

II. कौशल्य प्रशिक्षण, अन्न सुरक्षेबाबतचे तांत्रिक ज्ञान देणे, स्वच्छतेबाबतचे प्रमाणिकरण, गुणवत्ता व दर्जा व आरोग्यदायी (Hygiene) सुधारणा यासंदर्भात उद्योगांची क्षमता बांधणी करणे.

III. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व बँक कर्ज (Handholding Support) व गुंतवणुकीसाठी सहाय्य करणे.

१.४. "एक जिल्हा एक उत्पादन" (ODOP) धोरण :-

१.४.१. निविष्ठा खरेदी, सामान्य सेवांची उपलब्धता व उत्पादनाचे विपणन (विक्री) या दृष्टीने सोईचे होऊन अधिक फायदा व्हावा यासाठी योजनेमध्ये "एक जिल्हा एक उत्पादन" (ODOP) धोरणाचा अवलंब केला आहे. राज्य शासनाने सध्याचे जिल्हयातील भौगोलीक मानांकन (GI), पारंपारिक पिके, जिल्हयातील समूह (Clusters) व कच्च्या मालाची जादाची उपलब्धता (Surplus) इ. लक्षात घेवून प्रत्येक जिल्ह्यासाठी अन्न उत्पादनाची प्राधान्याने निवड केली आहे. याअनुषंगाने, राज्य शासनाची मान्यता मिळालेली "एक जिल्हा एक उत्पादन" (ODOP) यादी **प्रपत्र-१** मध्ये सहपत्रित करण्यात येत आहे.

१.४.२. एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) अंतर्गत असलेल्या सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना प्राधान्य दिले जाईल तसेच केंद्रशासनाचे दि १८.०५.२०२२ चे ज्ञापनानुसार इतर (NON-ODOP) सूक्ष्म अन्न प्रक्रिया उपक्रम देखील नवीन सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी अर्थ सहाय्यास पात्र आहेत.

१.४.३ विद्यमान कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विस्तारासाठी/स्तर वृद्धीसाठी किंवा नवीन सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी योजनेअंतर्गत सहाय्य केले जाईल तसेच "Waste to Wealth" वाया जाणाऱ्या कच्च्या मालापासुन उत्पादने तयार करणाऱ्या उद्योगास व पशु खाद्य उत्पादनास देखील अर्थसाहाय्य दिले जाईल.

२.०. योजनेअंतर्गत वैयक्तिक उद्योगांना सहाय्य :-

सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग- केंद्र शासनाची सोबत सहपत्रित अधिसूचना दि. १ जून, २०२० नुसार सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग म्हणजे ज्या उद्योगांची आवश्यक बांधकाम व यंत्रसामुग्री (Plant and Machinery) मधील गुंतवणूक रक्कम रु. १.०० कोटी (सर्व कर व इतर खर्च सहित) पेक्षा कमी आहे अथवा वार्षिक उलाढाल रु. ५.०० कोटी पेक्षा कमी आहे असे उद्योग म्हणजे सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग होय.

**कार्यरत उद्योग-** केंद्र शासनाच्या सोबत सहपत्रित दि. ०६.१०.२०२१ च्या सूचने अन्वये, कार्यरत अन्न प्रक्रिया उद्योगास उद्यम आधार, FSSAI व GST (लागू असल्यास) असे प्रमाणपत्र असणारे व नसणारे सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग लाभ घेण्यास पात्र आहेत. तथापी योजनेचा लाभ घेतलेल्या प्रकल्पांना उद्यम आधार, FSSAI व GST (लागू असल्यास) असे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहतील.

२.१. वैयक्तिक उद्योगांना खालील बाबींसाठी सहाय्य केले जाईल.

अ) बँक कर्जाशी निगडीत अनुदान सहाय्य.

आ) क्षमता बांधणी / प्रशिक्षण सहाय्य.

२.२ बँक कर्जाशी निगडीत अर्थसहाय्य :- (Credit linked capital subsidy)

२.२.१ जे अर्जदार वैयक्तिक नवीन सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारणी व कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे विस्तारीकरण आणि स्तरवृध्दी करु इच्छितात अशा सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना भांडवली गुंतवणूकीसाठी एकुण पात्र प्रकल्प किंमतीच्या कमाल ३५% अधिकतम रु १० लाखाच्या मर्यादेत बँक कर्जाशी निगडीत अर्थसहाय्य देय आहे. योजनेत बांधकाम व यंत्रसामुग्री (Plant & Machinery) आणि तांत्रिक बांधकामाचा (Technical Civil Work) समावेश आहे.

२.२.२ उद्योग उभारण्यासाठी आवश्यक जमिनीची किंमत /भाडे / भाडेकरारावरील शेडची (बिल्डींग) किंमत अर्थ सहाय्यास पात्र नाही. जर जमीन/शेड भाडे तत्वावर असेल तर भाडे करार किमान तीन वर्षाचा असावा. तांत्रिक बांधकाम पात्र प्रकल्प किंमतीच्या ३०% पेक्षा जास्त नसावे. लाभार्थींचा पात्र प्रकल्प किमतीच्या किमान १०% स्वनिधी असणे आवश्यक आहे. उर्वरित निधी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (RBI) अधिकृत (ज्या बँकेच्या शाखांना IFSC Code आहे अशा) बँकेकडून कर्ज रूपाने घेण्यात यावा.

## ३.०. योजनेअंतर्गत बँक कर्जाशी निगडीत अर्थ सहाय्य प्राप्त करण्यासाठी वैयक्तिक सूक्ष्म उद्योगांचे पात्रता बाबतचे निकष :-

१) कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे कामकाज चालू/सुरु असणे आवश्यक.

२) ज्या कार्यरत उद्योगांमध्ये विजेचा वापर होतो अशा उद्योगांचे नजीकच्या कालावधीचे विजेचे बील सदर उद्योग कार्यरत असल्याबाबत आधारभूत गृहित धरता येईल. इतर प्रकल्पांना सध्या चालू असलेले कामकाज, भांडार-उद्योगा संदर्भातील कच्चामाल, साहित्य/सामान (Inventory), मशिनरी व विक्री इ. बाबतच्या नोंदी सदर उद्योग कार्यरत असल्याचे आधारभूत धरण्यात यावे.

३) या उद्योगामध्ये १० पेक्षा कमी कामगार असावेत.

४) असे नवीन उद्योग जिल्ह्यातील प्राधान्यतः "एक जिल्हा एक उत्पादन"(ODOP) अंतर्गत निवडलेल्या उत्पादनामध्ये कार्यरत असावे परंतु सध्यस्थितीत कार्यरत किवा नवीन (NON ODOP) उत्पादन उद्योगांना देखील लाभ देय आहे.

५) बँकद्वारे पुर्नरचनेस बँकेकडून कर्जास पात्र असणाऱ्या तसेच जे आजारी उद्योग (Under Stress) आहेत, असे उद्योग देखील स्तरवृद्धी व विस्तारी करणासाठी अर्थ सहाय्यास पात्र आहेत.

६) पात्र अर्जदाराचा सदर उद्योगावर मालकी अधिकार असला पाहिजे.

७) मालकी अधिकार हा वैयक्तिक मालकी (प्रोपायटर/भागीदारी/प्रायव्हेट लिमिटेड/NGO) स्वरुपाचा असावा.

८) पात्र अर्जदाराचे वय किमान १८ वर्ष असावे. किमान शिक्षणाची कोणतीही अट नाही.

९) योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्यासाठी कुटूंबातील एकच व्यक्ती पात्र असेल. यासाठी कुटूंब म्हणजे कुटूंब प्रमुख स्वत: , जोडीदार (पत्नी किंवा पती) व मुले असे ग्राह्य धरण्यात येईल.

१०) सदर उद्योगाला औपचारिक स्वरुप देण्यासाठी अर्जदाराची तयारी असावी. तसेच प्रकल्प किंमतीच्या किमान १० % निधी स्वहिस्सा व उर्वरीत बँक कर्ज घेण्याची तयारी असावी.

११) कृतीसंगम योजनेतंर्गत दुसऱ्या योजनेतून लाभ घेतलेले व PMFME योजनेंस पात्र असणारे अर्जदार top up मार्फत अर्थसहाय्यास पात्र आहेत.

१२) शासनाने सूचित केल्याप्रमाणे अपंगांना व महिलांना प्राधान्य राहिल.

## ४.० योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठीची प्रक्रिया :

**४.१.१ या योजनेमध्ये लाभ मिळविण्यासाठी साधारणत: खालील प्रक्रियांचा समावेश होतो;**

अ) **अर्जदाराची** PMFME Portal **वर नोंदणी** (Registration).

आ) अर्ज भरणे (Draft) व सादर करणे (Submit).

इ) जिल्हा संसाधन व्यक्तींमार्फत अर्जाची पडताळणी व शिफारस.

ई) जिल्हा संसाधन व्यक्तींमार्फत शिफारस प्राप्त अर्जाची जिल्हास्तरीय समिती (DLC) मार्फत मंजुरी.

उ) बँक कर्जाशी जोडणी (Bank Linkage) - कर्ज मंजुरी (Sanctioned) व वितरण (Disbursement).

ऊ) लाभार्थीस अनुदान वितरण.

**४.१.२ PMFME योजनेचे पोर्टलवरील प्रक्रियेनुसार खालील लिंकप्रमाणे संकेतस्थळाचा वापर करावा;**

अ) PMFME Website Homepage – Link - http://pmfme.mofpi.gov.in

ब) PMFME Website Applicant Login – Link - https://pmfme.mofpi.gov.in/pmfme/#/Login

क) PMFME Website MIS Login – Link – http://pmfme.mofpi.gov.in/mis

**४.२. योजनेच्या पोर्टलवर (संकेतस्थळ) नोंदणी करण्याची पध्दत :-**

४.२.१ PMFME पोर्टलवर अर्जदारांने स्वत:ची नोंदणी करण्यासाठी वरील मुद्दा क्रमांक ४.१.२ “अ” मध्ये दिलेल्या लिंक चा वापर करून नोंदणी (Registration) करावी. त्यासाठी खालील टप्प्यांचा अवलंब करावा.

४.२.२ PMFME संकेतस्थळावर उजव्या बाजूवर असलेल्या “Login” पर्यायामधील “Applicant Registration (New User)” या पर्यायावर क्लिक करावे.

४.२.३ सर्वप्रथम नोंदणी फॉर्म पानावरील लाभार्थी प्रकारामधून (Type of Beneficiary) वैयक्तिक (Individual) या लाभार्थी प्रकाराची निवड करावी.

४.२.३ अर्जदारास लाभार्थी प्रकारामधून (Types of Beneficiary) ज्या लाभार्थी प्रकारांतर्गत अर्ज करावयाचा आहे त्या प्रकाराची निवड करून नोंदणी करावी. जसे; वैयक्तिक (Individual) / गट अर्ज (Group Application) / सामायिक पायाभूत सुविधा (Common Infrastructure facility).

४.२.४ अर्जदाराने लाभार्थी प्रकाराची निवड केल्या नंतर स्वत:ची माहिती जसे की नाव, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी, पत्ता, तालुका, जिल्हा, पिन कोड (आधार कार्डवर नमूद असल्याप्रमाणे) व व्यवसायाचे ठिकाण इत्यादी बाबत अचूक माहिती भरावी.

४.२.५ प्राथमिक नोंदणी पूर्ण झालेनंतर अर्जदारास/लाभार्थ्यास MoFPI कडून नोंदणी संदर्भात मोबाईलवर व ई-मेल आयडीवर संदेश प्राप्त होणार ज्यामध्ये नोंदणी क्रमांक (User ID) व नोंदणीची पडताळणी करणेसाठी लिंक (Activation Link) प्राप्त होईल. या लिंकवर क्लिक (Click) करून लाभार्थ्याने पुढील प्रक्रियेसाठी पासवर्ड नोंदवावा/ठरवावा. यापुढील सर्व प्रक्रियेसाठी सदर नोंदणी क्रमांक (User ID) व पासवर्ड (Password) हा अत्यंत महत्वपूर्ण असल्याने लाभार्थ्याने त्याचे योग्यप्रकारे जतन करावे.

**४.३. योजनेअंतर्गत अर्थ सहाय्यासाठी अर्ज भरण्याची व सादर करण्याची पध्दत (Submit) :**

४.३.१ वरील प्रक्रिया पूर्ण झालेनंतर लाभार्थ्याने/लाभार्थ्याने **मुद्दा क्रमांक ४.१.२ मधील “ब” मध्ये दिलेल्या** लिंक चा वापर करून त्यास प्राप्त झालेला नोंदणी क्रमांक (User ID) व पासवर्ड (Password) वापरुन पोर्टलवर लॉग-इन (Login) करावे. नोंदणी नंतर लाभार्थ्याने PMFME पोर्टलवर पहिल्यांदा लॉग-इन केल्यानंतर अर्ज भरण्यास सुरुवात करणेपुर्वी प्रस्तावित प्रकल्पाच्या / कार्यरत उद्योगाच्या आर्थिक उलाढालीनुसार खालीलप्रमाणे सुचविलेल्या तीन प्रकारामधून लागू असलेला पर्याय निवडावा.

अ) नविन वैयक्तिक उद्योग (New Individuals Business)

आ) वैयक्तिक उद्योग - १ कोटीपेक्षा अधिक उलाढाल(Individual Business Turn Over Greater Than 1 Cr)

इ) वैयक्तिक उद्योग - १ कोटी पेक्षा कमी उलाढाल (Individual Business Turn Over Less Than 1 Cr)

४.३.२ बँक कर्जाशी निगडीत अनुदानासाठी अर्जदाराने/लाभार्थ्याने योजनेच्या माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) मधून अर्ज सादर करावा. अर्जदार PMFME MIS प्रणाली हातळण्यास सक्षम नसेल तर अर्जदार संबंधित जिल्ह्यातील जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) यांची मदत घेवू शकतो. यासाठी अर्जदाराने त्यांचा Login ID (User ID) व Password) वापरण्यासाठी DRP यांस सहमती देणे आवश्यक आहे.

१) त्यानंतर PMFME **पोर्टलवर अर्जदाराने ऑनलाईन पध्दतीने** त्याचे संबंधित व त्याच्या प्रस्तावित / कार्यरत उद्योगासंबंधाने सविस्तर माहिती (सविस्तर प्रकल्प अहवाल-DPR) भरावी. जसे कि; अर्जदाराबाबतची सविस्तर माहिती, प्रस्तावित प्रकल्प किंवा सद्यस्थितीत कार्यरत उद्योगाबाबतची सर्वसाधारण माहिती (लागू असल्यास), प्रस्तावित किंवा सद्यस्थितीत कार्यरत प्रकल्पाच्या आर्थिक बाबीशी निगडीत माहिती. कर्जाची मागणी करणाऱ्या २ बँक शाखांची माहिती (बँक शाखांच्या पसंतीक्रमानुसार प्राधान्यक्रम ठरवावा) व आवश्यक कागदपत्रे अपलोड करून जतन करून (Draft मध्ये) घ्यावा.

२) बँकेस **सविस्तर प्रकल्प अहवालाची (DPR ची) गरज** असल्यास अर्जदार PMFME पोर्टलवरुन एक्सेल (Excel) स्वरुपातील DPR डाऊनलोड करुन घेऊ शकतो. यानंतर एक्सेल (Excel) स्वरुपात डाऊनलोड केलेल्या DPR मध्ये आवश्यक ती माहिती भरावी व कागदपत्रे अपलोड करण्याच्या पर्यायातून सदर तयार केलेला एक्सेल (Excel) स्वरुपातील DPR पोर्टलवर अपलोड करावा व प्रिंट-आउट करून बँकेस सादर करावा.

३) **PMFME पोर्टलवर अर्ज सादर करताना अर्जदाराने काळजीपूर्वक भरावयाची माहिती:**

अ) अर्जदारास एकूण पात्र प्रकल्प किंमतीपैकी किमान १०% स्वहिस्सा व उर्वरीत बँक कर्जाची माहिती.

आ) एकूण प्रकल्प किमतीच्या ३५% अनुदान देय असेल. याकरीता कमाल अनुदान मर्यादा रक्कम रु.१० लाख एवढी आहे.

इ) अर्जदारास कर्ज घेण्याकरीता त्याचा प्रकल्प ज्या जिल्हयातील आहे, त्या जिल्हयातील दोन बँकांचा तपशील पसंतीक्रमाप्रमाणे बँक कर्ज प्राप्त करून घेण्याकरीता नमूद करावा.

ई) अर्जदारास अनिवार्य (Mandatory) आणि इतर कागदपत्रे (Any other documents; जसे मशिनरी चे कोटेशन व बांधकामाचे अंदाजपत्रक इत्यादी) कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावी. (*अनिवार्य नसलेली कागदपत्रे पण कर्ज मंजुरीच्या अनुषंगाने गरजेची कागदपत्रे जोडल्यास उत्तम.)*

उ) अर्जदारास दिलेली माहिती सत्य असल्याबाबतचे घोषणापत्र (Declaration) पोर्टलवरच द्यावे.

ऊ) अंतिम टप्प्यामध्ये अर्जदाराने दिलेली माहिती पुनश्च तपासून / पडताळणी करून घ्यावी. तदनंतर माहिती योग्य भरलेली असल्यास पोर्टलवरील Submit या बटणावर क्लीक करून अर्ज अंतिमतः सादर करावा. *(टिप - एकदा अर्ज सादर (Submit) केल्यानंतर अर्जदारास दिलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही. त्यासाठी MIS वर भरलेली माहिती अर्ज अंतिम करण्यापूर्वी तपासून घ्यावी.)*

४.३.३ यशस्वीरित्या अर्ज सादर (Submit) केल्यानंतर अर्जदारास मोबाईलवर मेसेज येईल तसेच ई-मेलवर कळविले जाईल. अर्ज कसा भरावा याबाबतची तसेच PMFME योजनेसंदर्भाने सविस्तर माहिती YouTube वर short film च्या स्वरुपात उपलब्ध आहे.

## ४.४ जिल्हास्तरावर अर्ज मंजूर करण्याची पध्दत :-

४.४.१ अर्जदाराकडून अर्ज सादर केल्यानंतर सदर अर्जांची जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) ने लाभार्थ्यास भेट देऊन पडताळणी करावी. पडताळणी केल्यानंतर योजेनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रस्ताव योग्य असल्याची खात्री करावी. यानंतर जिल्हा संसाधन व्यक्तींनी (DRP) सदर अर्जांची जिल्हास्तरीय समितीकडे शिफारस करावी.

जिल्हा संसाधन व्यक्तीकडून सदर अर्जाची शिफारस केल्यानंतर असे अर्ज PMFME योजनेच्या वेबसाईट वरील संगणकीय प्रणालीद्वारे मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती (DLC) कडे वर्ग केले जातील.

४.४.२ जिल्हास्तरीय समिती (DLC) ने PMFME योजनेंतर्गत सादर केलेल्या (वैयक्तिक/गट/सामाईक पायाभूत सुविधा) उद्योजकांच्या बँक कर्जाशी निगडीत प्रस्तावांना शासन निर्णय व मार्गदर्शक सूचनेनूसार तपासणी करून मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून कार्यवाही करावी.

४.४.३ जिल्हास्तरीय समितीस (DLC) प्राप्त प्रस्ताव मंजूर करणे, नामंजूर करणे व प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यास त्यामध्ये सुधारणा / बदल सुचविण्याचा अधिकार असेल. जर या समितीस अर्जदाराकडून काही कागदपत्रांची किंवा माहितीची आवश्यकता असल्यास त्याबाबतची सुधारणा करण्याबाबत PMFME पोर्टलवर जिल्हास्तरीय समितीने अद्ययावत करावे तसेच त्याबाबतची माहिती लेखी पत्र/ईमेल/फोन द्वारे अर्जदारास द्यावी.

४.४.४ अर्जदारास त्याच्या प्रस्तावाच्या मंजुरी/नामंजूरी बाबत किंवा त्यामध्ये कोणतीही कमतरता असल्यास याबाबत PMFME योजनेच्या वेबसाईट वरील संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून मोबाईल संदेशाद्वारे व ई-मेल द्वारे कळविले जाईल.

४.४.५ योजनेच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे प्रस्ताव योग्य असल्याची जिल्हास्तरीय समितीची खात्री झाल्यास अशा प्रस्तावांची ऑनलाईन पध्दतीने बँकांना शिफारस करावी.

जिल्हास्तरीय समितीची बैठक घेण्यास उशीर होत असल्यास जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी पात्र प्रकल्पांना मंजूरी देऊन बँकेस कर्ज मंजूरी करीता शिफारस करावी. व मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीच्या आगामी बैठकीत अशा पात्र प्रकल्पांची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी. याबाबतच्या केंद्र शासनाच्या दि.०९.०८.२०२१ रोजीच्या सूचना सोबत सहपत्रित करण्यात आल्या आहेत.

## ४.५ जिल्हास्तरीय समितीकडून मंजूर प्रस्तावांना बँक कर्ज मंजुर करण्याची पद्धत : -

४.५.१ जिल्हास्तरीय समितीच्या शिफारसीनंतर अर्जदाराने प्राधान्यक्रमाने नोंदविलेल्या/सुचविलेल्या पहिल्या प्राधान्यक्रमांच्या बँकेकडे (First Lending Bank) कडे PMFME योजनेच्या वेबसाईट वरील संगणकीय प्रणालीद्वारे अर्ज सादर होईल.

४.५.२ सदर प्रस्ताव योग्य असल्यास मंजूरी किंवा नामंजूरी देण्याचा अधिकार कर्ज देणाऱ्या बँकेस असेल.

४.५.३ जर प्रस्ताव योग्य असेल तर बँक कर्ज मंजूरी देईल. तदनंतर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनूसार, कर्ज वितरणासाठीची कार्यवाही बँकेव्दारे केली जाईल. याबाबतचा तपशील बँकेने ऑनलाईन पध्दतीने PMFME योजनेच्या वेबसाईटवरील संगणकीय प्रणालीवर (PMFME Portal) सादर करणे आवश्यक आहे.

४.५.४ **बँक स्तरावर काही कागदपत्राची आवश्यकता असल्यास असे अर्ज बँक परत लाभार्थी स्तरावर पूर्ततेसाठी पाठवेल (Required additional documents). कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर असे अर्ज मंजुरीसाठी पात्र असेल.**

४.५.५ जर बँक कर्जाची मंजुरी अटी व शर्तीच्या अधीन राहून देत असेल व त्या अटी व शर्तीची पुर्तता लाभार्थ्याने दिलेल्या विहित कालमर्यादेत केली नसेल तर बँक असे प्रकल्प "मंजूर पण वितरीत केल्या जाऊ शकत नाही" (Santioned but not able disbursed) या शिर्षांतर्गत प्रलंबित ठेवेल व त्याची पुर्तता केल्यानंतर "Pull back for Disbursement" या पर्यायाचा वापर करून लाभार्थ्यास कर्ज वितरण करेल.

४.५.६ जर एखादा प्रस्ताव पहिल्या कर्ज देणाऱ्या बँकेस (First Lending Bank) असमाधानकारक वाटत असेल तर सदरचा प्रस्ताव संबंधीत बँकेने ऑनलाईन पध्दतीने रद्द (Reject) करणे आवश्यक आहे. पहिल्या कर्ज देणाऱ्या बँकेने (First Lending Bank) ऑनलाईन पध्दतीने अर्ज रद्द केल्यानंतर अर्जदाराचे प्राधान्यक्रमानुसार निवडलेल्या दुसऱ्या कर्ज देणाऱ्या बँकेत (Second Lending Bank) अर्ज सादर होईल. सदर दुसऱ्या कर्ज देणाऱ्या (Second Lending Bank) बँकेने कार्यवाही करणेसाठी Login करून वरील नमूद केल्याप्रमाणे प्रक्रिया पुर्ण करावी. जर दोन्ही बँकांनी प्रस्तावास नकार दिल्यास सदर प्रस्ताव अपात्र ठरविला जाईल. अशा अपात्र प्रस्तावास अर्जदाराने योजनेंतर्गत मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून कागदपत्रांची पुर्तता व आवश्यक बदल करून पुन:श्च अर्ज सादर करण्याची प्रक्रिया PMFME MIS पोर्टलवर करु शकतात.

४.५.७ **MIS प्रणालीवर बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर त्यात काही बदल करायचे असल्यास संबंधित बँक असे बदल कर्ज वितरणापूर्वी करू शकते. कर्ज वितरणानंतर MIS प्रणालीवर कोणताही बदल करता येणार नाही.**

४.५.८ अर्जाची सद्यस्थिती अर्जदारास वेळोवेळी मेसेज व ई-मेलव्दारे कळविली जाईल.

४.६ <u>बँक कर्ज वितरण करण्याची पध्दत: -</u> याबाबतच्या केंद्र शासनाच्या सूचना दि.२९.०५.२०२१ सोबत सहपत्रित करण्यात आलेल्या आहेत.

४.६.१ बँक कर्ज मंजूर झाल्यानंतर संबंधित बँकेने (Lending Bank) बँक कर्ज वितरणासाठी खालील पध्दतीचा अवलंब करावा.

४.६.२ कर्ज मंजूर करणारी बँक लाभार्थ्याचे नाव, Transient Account नंबर, प्रकल्पास कर्जाच्या मंजूरीबाबत ची नोंद MIS प्रणालीवर करेल. MIS प्रणालीवरील कर्ज वितरणासंबंधीच्या नोंदी बँकेने अद्यावत केल्यानंतर MoFPI च्या सूचनेनुसार अनुदानाची रक्कम राज्य नोडल एजन्सी मार्फत नोडल बँकमध्ये वितरीत केला जाईल. नोडल बँकेद्वारा अनुदानाची रक्कम कर्ज वितरणानंतर Lending बँकेच्या Transient Account मध्ये जमा करण्यात येईल.

४.६.३ लाभार्थ्याचे बँक कर्ज खाते नियमित (Standard/Regular) असल्यास तसेच सदर प्रकल्प कार्यरत असल्यास कर्जाच्या अंतिम वितरणापासून तीन वर्षांच्या कालावधीनंतर लाभार्थ्यास देय अनुदान रक्कम कर्ज खात्यात समायोजित केली जाईल. परंतु कर्जाच्या अंतिम वितरणापासून तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत लाभार्थ्यास देय अनुदान रक्कम कर्ज खात्यात समायोजित करता येणार नाही. कर्ज देणाऱ्या बँकेमध्ये अनुदानाची रक्कम जमा झालेल्या तारखेपासून अनुदानाच्या रक्कमे एवढया बँक कर्जाच्या रक्कमेवर बँकेस व्याज आकारता येणार नाही. परंतु, कर्ज वितरणाच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत खाते NPA झाल्यास अनुदानाची रक्कम बँकेव्दारे कर्ज परतफेडीची रक्कम म्हणून समायोजित केली जाईल. अनुदानाच्या समायोजनाचा तपशील जसे की समायोजनाची तारीख, कर्ज खात्याची स्थिती, समायोजन हे NPA किंवा Standard खात्यात केले जाईल. याबाबतची माहिती जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय व संबंधित जिल्हा संसाधन व्यक्तीस बँकेद्वारे देण्यात यावी.

५.० **कृतीसंगमः-** या योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थीस खालील योजनेमध्ये सहभागी होता येवू शकते.

५.१ Credit Guarantee Trust for Micro & Small Enterprises (CGTMSE) या संस्थेच्या National Credit Guarantee Trustee Company मधून त्यांच्या प्रचलित नियम व अटींनुसार या योजनेअंतर्गत दिलेल्या कर्जासाठी पतहमीचा लाभ घेता येईल. या योजनेंतर्गत अर्जदारास **रु. ५** कोटी पर्यंत चे कर्ज विना तारण मिळू शकते. यासाठी कर्जदारास **०.३७% ते १.३५ %** पर्यंत वार्षिक हप्ता (Premium) ३१ डिसेंबर रोजी थकीत असलेल्या कर्जावर देय आहे.

५.२ MUDRA (Micro Unite Development & Refined agency) सूक्ष्म घटक विकास आणि पुर्नवित्त संस्था या योजनेंतर्गत बँक रु. ५०,००० ते १०,००,००० पर्यंत विना तारण कर्ज उपलब्ध करु शकते. या योजनेंतर्गत कर्जाचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

१. शिशू - ५०,००० रुपये पर्यंत कर्ज मर्यादा.
२. किशोर - ५,००,००० रुपये पर्यंत कर्ज मर्यादा.
३. तरुण - १०,००,००० रुपये पर्यंत कर्ज मर्यादा.

५.३ AIF - MoFPI यांचेकडून प्राप्त झालेल्या SOP नुसार कार्यवाही करण्यात यावी. या योजनेंतर्गत प्राथमिक प्रक्रिया केल्या जाणाऱ्या उदयोगास ३% पर्यंत व्याज दरास अर्थ सहाय्य सवलत देय आहे. या

योजनेचा लाभ घेण्यासाठी बँकेचे वार्षिक व्याज दर ९% पर्यंत असल्यास ३% व्याज सवलत उपलब्ध आहे. तसेच ज्या अन्न प्रक्रिया उदयोगात प्राथमिक तथा व्दितीय प्रक्रिया होतात अशा उद्योगात फक्त प्राथमिक घटकावर व्याज दर सवलत असेल.

५.४ AHIDE (Animal Husbandry Infrastructure Development Fund) या योजनेअतंर्गत अन्न प्रक्रिया केल्या जाणाऱ्या उदयोगास ३% पर्यंत व्याज दरास अर्थसहाय्य सवलत देय आहे.

६.०. पाठपुरावा सहाय्य (Handholding Support):-

६.१. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना नियमीत मार्गदर्शन, सहाय्य व पाठपुरावा करण्यासाठी जिल्हा संसाधन व्यक्तींना (DRPs) योजनेअंतर्गत निवड करुन घेतले जाणार आहे. या संसाधन व्यक्ति सूक्ष्म उद्योगांच्या बाबतीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, बँक कर्ज मिळविणे, त्यांचे प्रशिक्षण, उद्योगांची स्तरवृध्दी करणे, आवश्यक नियामक (कायद्याने बंधनकारक) (Regulatory Approvals) मंजूऱ्या मिळविणे, उद्योगाच्या जागेतील स्वच्छता (Hygiene) इ. संदर्भात मार्गदर्शन व पाठपुरावा करतील.

६.२ वैयक्तिक अर्जदार ज्यांना या योजनेअंतर्गत सहाय्याचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी संबंधित संसाधन व्यक्तिंशी संपर्क साधून अर्ज सादरीकरण, DPR तयार करणे, बँक कर्ज मिळविणे यासंदर्भात सहाय्य घ्यावे. तसेच MIS Portal वर आवश्यक माहिती भरावी.

६.३. जिल्हा ससांधन व्यक्तीस अर्जदार / लाभार्थांस पाठपुरवठा करण्यासाठी योजने मार्फत रु. २०,००० प्रति प्रकल्प २ टप्प्यात मानधन देय आहे. यामध्ये प्रकल्पाच्या बँक कर्ज मंजूरीनंतर ५०% मानधनाची रक्कम देय आहे. उर्वरीत रक्कम प्रकल्प सुरु झाल्यावर /प्रकल्पाचे Formalization झाल्यानतंर (आवश्यक कागदपत्रे जसे; उद्योग आधार, FFSAI, GST प्रमाणपत्र सादर करुन त्याबाबतचा अहवाल PMFME पोर्टलवर Performance व Fund Monitoring या पर्यायांतर्गत भरल्यानंतर) देय आहे. तसेच जे DRP पूर्ण अर्ज प्रक्रिये साठी सक्षम नाही असे DRP जिल्हयातील सक्षम DRP किंवा CA यांची मदत घेवू शकतात. यासाठी रु.५,००० पर्यंत चे मानधन DRP ना मदत करणाऱ्या व्यक्तीस देवू शकतात. (एकूण २०,००० मानधनापैकी)

६.४. जिल्हा ससांधन व्यक्ती (DRP) यांना निवड झालेनंतर राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था (SLTI) मार्फत दोन दिवसांचे ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणानंतर FICSI मार्फत DRP यांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येते. परीक्षेत उत्तीर्ण झालेले DRP यांची नेमणूक पुढे चालू ठेवण्यात येते व जे DRP परिक्षा उत्तीर्ण होत नाहीत त्यांना आणखी दोन वेळा परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येते. जे DRP दोन वेळा संधी देवूनही उत्तीर्ण होत नाहीत. त्यांची नेमणुक रदद करण्यात येते.

७.०. योजनेबाबतचे मार्गदर्शन, संपर्क व प्रचार प्रसिध्दी तपशील :-

७.१. या योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना या केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय या संकेतस्थळावर www.mofpi.nic.in तसेच कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांचे संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in येथे पाहाता येतील. वैयक्तिक उद्योजक किंवा योजनेशी संबंधित अन्य घटकांनी राज्य नोडल एजन्सी (SNA) किंवा संबंधित जिल्ह्यातील कृषि विभागाच्या

कार्यालयातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी व तालूका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक, MSRLM, NULM, NCDC, MCDC, DIC, KVIC, माविम, जिल्हा अग्रणी बँका, कृषि विज्ञान केंद्र, पणन महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, आदिवासी विभाग, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग मत्स्यव्यवसाय विभाग आणि अनुषंगिक विभाग व भागधारक यांच्याशी संपर्क साधावा.

MIS पोर्टलवरील तांत्रिक अडचणींकरीता अर्जदार,जिल्हा संसाधन व्यक्ती (DRPs) किंवा जिल्हा नोडल अधिकारी यांनी support-pmfme@mofpi.gov.in या ईमेलवर अथवा ०१३० २२८ १०८९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

(सुभाष नागरे)
नोडल अधिकारी (PMFME) तथा
संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.

# प्रपत्र-अ

## कर्ज प्रक्रियेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे

I. Mandatory Documents

१. PAN Card of Company

२. Aadhaar Copy

३. Address Proof:- Any one of Officially Valid Documents-OVD : i) Utility bill, not more than two months old of any service provider, (Electricity, telephone, post-paid mobile phone, piped gas, water bill) or ii. Property or Municipal tax paid receipt or iii. Ration Card (Individual), iv) Driving Licence, v) Aadhaar Card, vi) Voter ID Card

४. Photocopy of Bank Statement/ Bank Passbook for the last ६ months of the Beneficiary company.

५. GST returns of last ३ years (for existing unit)

६. Estimates and Quotation of all capital expenditure and Machineries and Equipment to be purchased.

७. Details of site where Unit is established. Whether owned/rented/leased? and Proof thereof.

II. In case of Expansion

१. Udhayam Registration (In case of Expansion)

२. Audited balance sheet with annexures of max. ३ years (In case of Expansion)

३. Copy of License as per industry (FSSAI, Pollution Clearance, ESI etc), (In case of Expansion)

४. GSTIN Registration Certificate (In case of Expansion)

५. List of existing machinery and equipment. (In case of Expansion)

II. DPR Optional Documents

१. Loan statement/Sanction letter of active loans, if any

२. Insurance Policy copy of the existing unit & Stock.

३. Latest Stock Statement/register

४. Quarter-wise sales-purchase of previous year and current year

५. Copies of Minutes of last AGM and Board meeting

६. Copies of recent grants

७. Annual Report for the last year

८. Agreements made with Buyers

९. Any other Document

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)
## उत्पादक स्वयंसहाय्यता गट, शेतकरी उत्पादक कंपनी / संस्था, सहकारी संस्था व अशासकीय संस्था (गट लाभार्थी) मांडवली गुंतवणुकीकरिता अनुदान

### मार्गदर्शक सूचना-२०२३-२४
VOCAL FOR LOCAL

केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेमार्फत आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत "प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत " (PM FME) भांडवली गुंतवणूकी पोटी अर्थ सहाय्य या घटकासाठी गट लाभार्थी (स्वयं सहायता गट / शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था) व अशासकीय संस्था (NGO) पात्र आहेत.

केंद्रशासनाचे दि १८.०५. २०२२ च्या ज्ञापनानुसार गट लाभार्थी हे वैयक्तिक लाभार्थी म्हणून संबोधले आहेत. त्यामुळे "वैयक्तिक लाभार्थी अर्थ सहाय्य सन २०२२-२३" या मार्गदर्शक सूचना गट लाभार्थी यांना लागू असतील.

**अ. अर्ज करणाऱ्या गट लाभार्थींना बँक कर्जाशी निगडीत अनुदान मिळण्यासाठीची निकष**

१. "एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) तसेच Non ODOP उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये कार्यरत व नवीन सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी गट लाभार्थ्यांना (स्वयं सहायता गट / शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था अशासकीय संस्था (NGO)) यांन अर्थसाहाय्य दिले जाईल.
२. गटाकडे पात्र प्रकल्प किंमतीच्या किमान १०% स्वनिधी असावा.
३. गटातील सभासदांना अनुभवाची व शिक्षणाची कोणतीही अट नाही
४. गटातील सभासदांची वयोमर्यादा किमान १८ वर्षे पूर्ण झालेली असावी
५. स्वयं सहायता गटातील बीज भांडवलाचा लाभ घेतलेले लाभार्थी पात्र आहेत

**आ. योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठीची प्रक्रिया-**

गट लाभार्थी अर्ज मंजुरीची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

१. अर्जदाराची PMFME पोर्टल वर नोंदणी (Draft) करावी.
२. अर्ज भरणे व सादर करणे (Submit) आवश्यक.
३. जिल्हा संसाधन व्यक्तींमार्फत अर्जाची पडताळणी व DLC कडे शिफारस करणे.
४. DLC ने सदर अर्ज छाननी करून बँकेकडे पाठवणे.
५. बँक कर्जाशी जोडणी.

**इ. गट लाभार्थींना मिळणारे संभाव्य फायदे:-**

१. भांडवली गुंतवणूकीकरिता (Capital investment) बँक कर्जाशी निगडीत पात्र प्रकल्प किंमतीच्या ३५% अनुदान देय असेल. याकरिता कमाल अनुदान मर्यादा रु. १० लाख.

२. जिल्हा संसाधन व्यक्तीने (DRP)गट लाभार्थाचा सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) तयार करून बँक कर्ज मंजुरी व प्रकल्पास औपचारिक (formalize) दर्जा प्राप्ती पर्यंतच्या हात मिळवणी साहाय्यकरिता प्रति प्रकल्प रु. २०,०००/- शुल्क जिल्हा संसाधन व्यक्तींना देय आहे. सदरचे शुल्क दोन टप्यात देण्यात येणार आहे. ५० % शुल्क बँक कर्ज मंजुरी नंतर देय असून उर्वरित ५० % रक्कम प्रकल्पास FSSAI, उद्यम आधार व GST (लागू असल्यास) प्रमाणपत्र प्राप्त करून तो MIS पोर्टलवरील Fund Monitoring and Performance Monitoring Module मध्ये अद्ययावत केल्यानंतर देय आहे.

३. सविस्तर प्रकल्प आराखडा मध्ये आवश्यकतेनुसार उद्योगासाठी लागणाऱ्या पॅकेजिंग मशीन, लेबल छपाई मशीन / रोलर, पदार्थ तयार करण्यासाठी लागणारी भांडी ( Utensils), स्वच्छता करणारी मशीन (Floor Cleaning Machine) तसेच एकूण प्रकल्पाच्या ३०% पर्यंत Technical Civil Work बांधकाम (शेड) समाविष्ट असावे.

४. अन्न प्रक्रीये साठी लागणारी स्वच्छता मानके, FSSAI, उद्यम आधार, वजन मापे नियंत्रण व नोंदणी आणि GST लागू असल्यास) प्रमाणपत्र मिळवण्यासाठी लागणारी किंमत समाविष्ट असावी. वरील मुद्दे क्र. ३ व ४ मधील तरतुदीचा सखोल अभ्यास करून आवश्यकतेप्रमाणे DPR मध्ये बाबी प्रस्तावित कराव्यात.

५. सदर उद्योगाला औपचारिक स्वरुप देण्यासाठी अर्जदाराची तयारी असावी, तसेच प्रकल्प किंमतीच्या किमान १० % निधी स्वहिस्सा व उर्वरीत बँक कर्ज घेण्याची तयारी असावी.

(सुभाष नागरे)
नोडल अधिकारी (PMFME) तथा
संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.

# मार्गदर्शक सूचना-सन २०२३-२४

Pradhan Mantri Formalisation of Micro Food Processing Enterprises (PMFME)

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत

## स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांसाठी बीज भांडवल (Seed Capital)

VOCAL FOR LOCAL

१. प्रस्तावना :-

१.१.: केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (MOFPI), भारत सरकार, नवी दिल्ली यांच्यामार्फत आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत "प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना" (PMFME) सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत सध्या कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांची स्तरवृद्धी करण्याच्या दृष्टीने व या असंघटित (Unorganized) क्षेत्रास औपचारिक (Formalised) स्वरुप प्राप्त करुन देण्यासाठी सहाय्य दिले जाईल. योजनेची अंमलबजावणी सन २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षाच्या कालावधीत केली जाणार आहे. सदर योजनेकरिता देशासाठी १०००० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. योजनेचा भर सूक्ष्म अन्न प्रक्रिया क्षेत्रातील वैयक्तिक व गट लाभार्थी जसे की शेतकरी उत्पादक गट/कंपनी/संस्था, स्वयंसहाय्यता गट व उत्पादक सहकारी संस्थांना त्यांच्या एकंदर मुल्यसाखळी निर्मितीसाठी सहाय्य करणे यावर राहील. सदर योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे अर्थसहाय्य उपलब्ध होईल.

i. ग्रामीण भागातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यास लहान साधने/छोट्या औजारांची (Small Tools) खरेदी व खेळते भांडवल यासाठी कमाल रु. ४०,०००/- प्रति सदस्य व प्रति स्वयंसहाय्यता गट कमाल रक्कम रु. ४,००,०००/- या मर्यादेतच अर्थसहाय्य दिले जाईल. (MoFPI चे दिनांक ११/०२/२०२२ रोजीचे OM)

ii. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील स्वयंसहाय्यता गट व तसेच गटातील वैयक्तिक सदस्यास भांडवली गुंतवणूकीकरिता पात्र प्रकल्प किंमतीच्या ३५% व कमाल रु. १० लाखाच्या मर्यादेत बँक कर्जाशी निगडीत अनुदान दिले जाईल. विशेष करुन स्वयंसहाय्यता गटास प्राधान्य राहिल. **MoFPI चे दिनांक २१/१०/२०२१ रोजीचे OM नुसार बीज भांडवल या घटकाचा लाभ ज्या गटांनी/गटातील सदस्यांनी घेतला आहे त्यांनासुद्धा या बाबीचा तसेच प्रशिक्षण, सामाईक सुविधा केंद्र व मार्केटिंग व ब्रँडिंगचा लाभ घेता येईल.**

iii. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील शेतकरी उत्पादक गट/कंपनी/संस्था, स्वयं सहाय्यता गट, उत्पादक सहकारी संस्था व अशासकीय संस्था भांडवली गुंतवणूकीकरीता पात्र प्रकल्प किंमतीच्या ३५% कमाल रक्कम रु. १०.०० लाख अनुदान देय आहे.

iv. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली यांचा दिनांक ०१.०७.२०२२ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनानूसार (OM) SRLM मार्फत भांडवली गुंतवणूकीसाठी बँक कर्जाशी निगडीत अनुदान (Credit Linked Grant) हा घटक राबविण्याचे सूचित करण्यात आलेले आहे.

सदर सूचनांन्वये, उमेद अभियानात स्वयं सहाय्यता गटांना सहाय्य देण्यासाठी कार्यरत समुदाय संसाधन व्यक्ती यांच्यामधून सद्यस्थितीत प्रती जिल्हा १० जिल्हा संसाधन व्यक्तींची निवड करणे. सदर निवड केलेल्या DRP यांना PMFME Portal वर अर्ज दाखल करणेसाठी MoFPI, नवी दिल्ली मार्फत Login Credential उपलब्ध करुन देण्यात येतील.

विविध टप्प्यावर लाभार्थी अर्ज एकत्रित करणे, कर्ज मंजूरी, प्रकल्पाचे औपचारिकीकरण (Formalization) आणि प्रकल्प कार्यान्वित करणे (Operationalization), इ. जबाबदारी निवडलेल्या DRP यांची राहील.

v. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली यांचा दिनांक ०२.०९.२०२२ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनानूसार (OM) बीज भांडवल प्राप्त लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात येईल.

vi. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना त्यांच्या उत्पादनांचे ब्रँडींग व विपणनासाठी अर्थसहाय्य दिले जाईल.

१.२.: दिनदयाल उपाध्याय योजनेअंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (DAY-NRLM) मार्फत गाव व समूह स्तरावरील स्वयं: सहाय्यता गट व त्यांच्या संघांना (Federation) आर्थिक सहाय्याबरोबरच पाठपुरावा सहाय्य (Hand holding Support) दिले जाते. स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांसाठी कृषी व अकृषी क्षेत्रातील विविध अजीविका उपक्रमांसाठी सहाय्य दिले जात आहे. अन्न प्रक्रिया क्षेत्रातील अकृषी अजीविका उपक्रमांसाठी देखील मोठ्या प्रमाणात सहाय्य केले जाते. माहे जुलै २०२० अखेर देशात एकूण ६३.३९ लाख स्वयंसहाय्यता गट स्थापन केले असून ६९७.५७ लाख कुटूंबे त्यामध्ये सहभागी आहेत. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार व ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी एकत्रितपणे काम करण्याचे मान्य केले असून स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांनी या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणावर घ्यावा यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. ग्रामीण विकास मंत्रालय (MoRD), भारत सरकार व केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (MoFPI), भारत सरकार यांच्यामध्ये PMFME योजनेंतर्गत सर्व राज्यामधील राज्य ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत (SRLM) स्थापित करण्यात आलेल्या स्वयं सहाय्यता समूहामधील अन्नप्रक्रिया उद्योगांना बळकटीकरण करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात लाभ व्हावा यासाठी राज्य नोडल एजन्सी (SNA), पुणे व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई एकत्र येवून काम करणार आहेत. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (MoFPI), भारत सरकार व ग्रामीण विकास मंत्रालय (MoRD) यांनी विविध सेवांच्या एकत्रीकरणा संदर्भात दिलेल्या सुचना (**जोडपत्र - ए**) मध्ये दिल्या आहेत.

**२. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार (MoFPI) /राज्य नोडल एजन्सी (SNA), पुणे व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) /महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांची भूमिका व जबाबदाऱ्या :-**

२.१.: राज्यात योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य नोडल एजन्सीची (SNA), पुणे असेल. उत्पादक स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना बीज भांडवल या उपघटकाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांच्याकडे असेल. स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना खेळते भांडवल व छोटया औजारांची खरेदी याकरीता सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगाशी संबंधीत सदस्यांना कर्ज किंवा गूंतवणूक/भांडवल (Seed Capital) म्हणून फेडरेशन मार्फत कमाल रु. ४०,०००/- प्रति सदस्य किंवा कमाल रु. ४,००,०००/- प्रति स्वयं सहाय्यता गट अनुज्ञेय राहील. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार (MOFPI) यांचेमार्फत राज्य

नोडल एजन्सीला (SNA), पुणे, बीज भांडवलासाठीचा निधी अनुदान म्हणून उपलब्ध होईल. राज्य नोडल एजन्सी (SNA), पुणे हा निधी पुढे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई, यांना वितरीत करील. हा निधी समुदाय संस्था (C.B.Os) जसे की, प्रभाग संघ (CLFs)/ग्राम संघ (VOs) या स्तरावर अनुदानाच्या स्वरुपात दिला जाईल व या संस्था स्वयं सहाय्यता गटातील सदस्यांना प्राप्त निधी कर्ज स्वरुपात देतील. सदस्यांकडून परतफेड झालेले कर्ज हे या संस्थांचा स्थायी निधी (Corpus Fund) म्हणून त्यांच्याकडे जमा होईल. कॉपर्स फंडात परतफेड केलेले बीज भांडवल हे वैयक्तिक आणि गटासाठी १०% लाभार्थी स्वःहिस्सा (Beneficiary contribution) व स्वयं सहाय्यता गटांना (SHGs) खेळत्या भांडवलासाठी २०% मार्जिन मनी म्हणून वापरु शकतात (OM-दिनांक ०१.०७.२०२२). योजनेच्या कालावधीत राज्यातील कार्यरत स्वयंसहाय्यता गटातील किती सदस्यांना बीज भांडवल निधी उपलब्ध करावयाचा याबाबतचा निर्णय केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, (MoFPI) भारत सरकार घेईल.

२.२.: केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकारने "एक जिल्हा एक उत्पादन"(ODOP) धोरणानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठीचे एक उत्पादन निश्चित केले आहे. जे स्वयंसहाय्यता गट/ सदस्य "एक जिल्हा एक उत्पादन" (ODOP) धोरणानुसार निवडलेल्या उत्पादनावर काम करीत असतील अशा गटांना/सदस्यांना प्राधान्य दिले जाईल.

२.३.: योजनेअंतर्गत बीज भांडवल घटकांतर्गत स्वयं सहाय्यता गटातील सदस्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई खालील उपक्रम हाती घेईल.

i. MSRLM मधील अधिकारी, कर्मचारी यांचे योजना अंमलबजावणीबाबत प्रशिक्षण देणे. तसेच स्वयंसहाय्यता गटांच्या संघाची (Federation) क्षमता बांधणी व पाठपुरावा सहाय्य (Handholding support) देणे.
ii. योजनेंतर्गत पात्र होणा-या **सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये काम करणाऱ्या** स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांची माहिती घेणे.
iii. योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता गटातील अन्न प्रक्रिया क्षेत्रामध्ये सहभागी असलेले व अर्थसहाय्यास पात्र असलेल्या सदस्यांची निवड करणे.
iv. मार्गदर्शक सुचनेनुसार समुदाय संस्थाच्या (C.B.Os) स्तरावर उद्योगाची निवड, अर्ज प्रक्रिया, कर्जाचे वितरण, कर्जाची परतफेड व उद्योगांचे सनियंत्रण यासाठी कार्यपध्दती निश्चित करणे.
v. स्वयंसहाय्यता गटाच्या उद्योगांची माहिती मिळविण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) च्या माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) चा वापर करणे. तसेच PMFME योजनेच्या MIS मध्ये आवश्यक माहिती अद्यावत (अपडेशन) करणे. (www.nrlm.gov.in)
vi. योजनेचा प्रगती अहवाल जिल्हास्तरावरील समितीमध्ये लिखीत स्वरुपात सादर करावा.

३. <u>स्वयंसहाय्यता गटांची बीज भांडवलासाठी ची पात्रता / निकष: -</u>

१) स्वयंसहाय्यता गटातील जे सदस्य कार्यरत अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये सध्या सहभागी आहेत तेच बीज भांडवलाच्या सहाय्यासाठी पात्र असतील. तसेच बीज भांडवल निधीकरिता सर्वसाधारण निकष खालीलप्रमाणे आहेत.

| अक्र | निकष | निकषाबाबतचा दस्तऐवज |
|---|---|---|
| १ | अन्नप्रक्रिया उद्योग हा ODOP मधील अन्न घटकावर आधारित असल्यास प्राधान्य | एक जिल्हा एक उत्पादन बाबतचे कृषी विभागाचे पत्र |
| २ | अन्नप्रक्रिया उद्योगांचे FSSAI नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या उद्योगांना प्राधान्य . | FSSAI नोंदणीपत्र |
| ३ | किमान १ वर्षापासून सुरू असलेल्या अन्नप्रक्रिया उद्योगांना प्राधान्य | उद्योग आधार / उद्योगासाठी कर्ज घेतल्याचा पुरावा/ समुदाय संस्थेचा ठराव इ. |
| ४ | उद्योजकाने अन्नप्रक्रिया उद्योगांचे प्रशिक्षण घेतले असल्यास प्राधान्य | प्रमाणपत्र / प्रशिक्षणात सहभागी झाल्याबाबतचा पुरावा |
| ५ | अन्नप्रक्रिया उद्योगामधील सदस्यांनी यापूर्वी समुदाय संस्था /बँकामार्फत कर्ज घेतले असल्यास उद्योगांना प्राधान्य | समुदाय संस्थेचा ठराव / बँक कर्ज दस्तऐवज |
| ६ | रु. १ लाख पेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असलेल्या उद्योगांना प्राधान्य | प्रभागसंघ / ग्रामसंघामार्फत वार्षिक उलाढालाबाबत प्रमाणपत्र |
| ७ | उद्योगासाठी GST चे नोंदणीकरण झालेले असल्यास सदर उद्योगांना प्राधान्य | GST चे नोंदणीपत्र |

२) स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांनी स्वयंसहाय्यता गटास व समुदाय संस्था (C.B.Os) (प्रभागसंघ/ग्रामसंघ) यांना खात्री दिली पाहीजे की, मिळालेल्या रक्कमेचा वापर केवळ अन्न प्रक्रिया उपक्रमासाठी लहान मशिनरी खरेदी करण्यासाठी व खेळते भांडवल यासाठीच केला जाईल.

३) बीज भांडवल देण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई समुदाय संस्थांमार्फत स्थापित स्वयं सहाय्यता गटातील सदस्यांची सविस्तर प्राथमिक माहिती जमा करेल. त्यामध्ये प्रक्रिया केले जाणारे उत्पादन, वार्षिक उलाढाल, कच्च्या मालाची उपलब्धता, उत्पादनाची विक्री इ.माहितीचा समावेश असेल. अधिक तपशील **जोडपत्र - सी** मध्ये दिला आहे.

४) शासनाने सूचित केल्याप्रमाणे अपंगांसाठी व महिलांना प्राधान्य राहिल.

५) सदर योजने अंतर्गत लाभार्थ्यांची द्विरुक्ती होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

६) सदर बाबतचे लेखे जिल्हास्तरावर जतन करण्यात येऊन लेखापरिक्षणाचे वेळेस सादर करावेत.

४. <u>बीज भांडवल प्रस्ताव सादरीकरण ते मंजूरीचे टप्पे व प्रक्रिया :-</u>

४.१.: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई राज्य नोडल एजन्सीच्या (SNA), पुणे समन्वयातून योजनेबाबत स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांमध्ये जनजागृती निर्माण करील.

त्यासाठी मोहिमेच्या माध्यमातून सर्व सदस्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जाईल. मोहिमेचा तपशील व आवश्यक साहित्य राज्य नोडल एजन्सी (SNA), पुणे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांना देईल. याशिवाय अन्य दृकश्राव्य मशिनरी किंवा डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करावयाचा असेल तर महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई तसे सुचवू शकते. या कामासाठी जर अतिरिक्त निधी लागत असेल तर तसे राज्य नोडल एजन्सीला (SNA), पुणे सुचवावे व तसा प्रस्ताव सादर करावा. मान्यतेनंतर राज्य नोडल एजन्सी (SNA), पुणे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांना निधी वितरीत करील.

४.२.: स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी MSRLM मधील इतर विभागासोबत अभियानामधील अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान अंतर्गत कृतीसंगम (Convergence) करून योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. विशेषत: कृतीसंगम (Convergence) /उपजीविका /संस्था बांधणी/क्षमता बांधणी/सनियंत्रण व मुल्यमापन, इत्यादीसाठी असेल.

४.३.: स्वयंसहाय्यता गटांसाठीच्या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये राज्य स्तरापासून क्षेत्रिय स्तरापर्यंत सहभागी होणाऱ्या लोकांसाठी अंमलबजावणीमधील विविध प्रक्रिया, उपक्रम, योजनेचे संनियंत्रण इ. बाबत प्रशिक्षण दिले जाईल. त्यामध्ये राज्य नोडल एजन्सीचे चमू (Team) सदस्य, जिल्हा व तालुका स्तरावरील सदस्य, समुदाय संस्थेमधील (CBO) सदस्य, समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) जे योजनेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार आहेत त्यांचे प्रशिक्षण होईल. याशिवाय योजनेअंतर्गत उद्योजकता विकास कार्यक्रम (EDP), जिल्ह्यातील निवडलेला शेतमाल/उत्पादन व किरकोळ वनउपज इत्यादी बाबतचे प्रशिक्षकांसाठीचे प्रशिक्षण (TOT) आयोजित केले जाईल. पुढे हे प्रशिक्षक अंमलबजावणीतील अन्य संबंधित घटक व लाभार्थ्यांचे प्रशिक्षण घेतील.

४.४.: प्रशिक्षणाचे आयोजन व प्रशिक्षण साहित्यासाठी आवश्यक निधीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई राज्य नोडल एजन्सी (SNA), पुणे यांना सादर करील. राज्य नोडल एजन्सी उपरोक्त प्रस्तावाची शिफारस केंद्र स्तरावर (MoFPI) करेल. केंद्र शासनाच्या (MoFPI) मान्यतेनंतर राज्य नोडल एजन्सी (SNA), पुणे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई कडे या निधीचे हस्तांतरण करील. आवश्यकतेनुसार प्रशिक्षण, मॉड्यूल्स, प्रशिक्षण तपशील (Content), प्रशिक्षक व मास्टर ट्रेनर्स यांची उपलब्धता राज्य नोडल एजन्सी (SNA), पुणे व केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली मार्फत करण्यात येईल.

४.५.: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई समुदाय संसाधन व्यक्तींचे (CRPs) मानधन व प्रशिक्षण खर्चाची तरतूद याबाबतचा कार्यालयीन आदेश काढेल. (MoFPI चे दिनांक १८/०७/२०२२ रोजीचे OM अन्वये बीज भांडवल घटक राबविण्यासाठी हाताळणी सहाय्य खर्च रु. २४३७/- प्रति उद्योग (Enterprise) निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर निधी पहिला टप्पा - रु.१०००/- व दुसरा टप्पा रु. १४३७/- असे दोन टप्प्यांमध्ये वितरीत करण्यात येणार आहे.)

४.६.: स्वयंसहाय्यता गटातील सदस्य ज्यांना भांडवली गुंतवणूक व खेळते भांडवल उपलब्ध करुन घेवून व्यवसाय वाढवावयाचा आहे. अशा सदस्यांची निवड करून त्यांची माहिती संकलित करण्याची जबाबदारी ही महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (MSRLM), नवी मुंबई यांची असेल. स्वयं सहाय्यता गटांचा गावस्तरावरील ग्रामसंघ (VO) व समूह स्तरावर प्रभागसंघ (CLF) आहे. PMFME योजनेच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसहाय्यता गटांची निवड करतांना प्रभागसंघाची भूमिका

महत्वाची असून त्यांनी पुढाकार घ्यावा. योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या सदस्यांनी **जोडपत्र- बी-फॉर्म** १,२ व ३ या विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा.

५. <u>महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान(MSRLM), नवी मुंबई यांच्याकडील अर्जांची/प्रस्तावांची प्रक्रिया :</u>

**५.१.:** MoRD व MoFPI यांच्या एकत्रित मार्गदर्शक सूचनांनुसार MoFPI मार्फत बीज भांडवल (Seed Capital) हे State Nodal Agency (SNA) कडून SRLM कडे देण्यात येणार आहे व सदर भांडवल SRLM मार्फत प्रभागसंघ, ग्रामसंघ व स्वयं सहाय्यता समूहामार्फत सदस्यापर्यंत वितरीत होणार आहे.

मुद्दा क्र. ४.१ नुसार जनजागृती झाल्यानंतर त्याचवेळी इच्छुक स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांकडून आलेल्या पात्र अर्जांना संबंधीत स्वयंसहाय्यता गटामार्फत **(अर्ज मंजूरी प्रपत्र-जोडपत्र-डी नुसार)** मान्यता (Approval) दिली जाईल. नंतर ग्रामसंघाच्या बैठकीमध्ये या अर्जांना **(अर्ज मंजूरी प्रपत्र-जोडपत्र -इ** नुसार) मान्यता (Approval) दिली जाईल. त्यानंतर मान्य झालेले अर्ज प्रभागसंघाकडे (CLF) सादर केले जातील.

**५.२.:** या योजनेअंतर्गत प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्तिंना (CRP/कृषीसखी/CTC/पशुसखी इ.) गरजेनुसार स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांकडून अर्ज सादर करण्यासाठी व इतर आवश्यक सहाय्य करण्यासाठी MSRLM नियुक्त करेल. **समुदाय संसाधन व्यक्ती (CRP /कृषीसखी / CTC / पशुसखी इ.) यांनी उपरोक्तनुसार जास्तीत जास्त निकष पूर्ण करणाऱ्या अन्नप्रक्रिया उद्योजकाचे परिपूर्ण प्रस्ताव तयार करून ग्रामसंघ / प्रभागसंघ यांना मान्यतेस्तव सादर करावेत.**

**५.३.:** प्रभागसंघामधील जीवनोन्नती उप-समिती (Livelihood Subcommittee) आलेल्या अर्जांची छाननी करील व त्यांची निरिक्षणे व शिफारशीसह प्रभागसंघाच्या कार्यकारी समितीकडे (Executive Committee) मान्यतेसाठी सादर करील.

प्रभागसंघ/ग्रामसंघ यांच्या उपजीविका समितीने बीज भांडवलासाठी प्राप्त प्रस्तावांची पडताळणी करताना उपरोक्त ३.१ मध्ये नमूद निकषांपैकी जास्तीत जास्त निकष पूर्ण करणाऱ्या उद्योजकांच्या प्रस्तावांना प्राधान्य देऊन सदरचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्रभागसंघ/ग्रामसंघ यांच्या कार्यकारी समितीकडे ठेवावे.

**५.४.:** प्रभागसंघाच्या कार्यकारी समितीकडून मान्यता प्राप्त अर्ज तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष (BMMU) यांच्याकडे पाठविले जातील. सदर प्राप्त अर्जांची नोंदणी तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाकडून राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) यांनी विकसित केलेल्या www.nrlm.gov.in या संकेतस्थळावरील MIS Portal वर केली जाईल. अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये कार्यरत असलेले सदस्य ज्या स्वयंसहाय्यता समूहाची सदस्य आहेत, तो समूह ग्रामसंघामध्ये समाविष्ट (ग्रामसंघाला जोडलेला) असणे अनिवार्य आहे. तसेच सदर समूहाच्या व सदस्यांचा बँक खात्याचा तपशील हा NRLM पोर्टलवर लिंक असणे गरजेचे आहे. तसेच तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाकडून प्रभागसंघांच्या / ग्रामसंघाच्या कार्यकारी समितीने मान्यता दिलेल्या प्रस्तावांची पडताळणी व खातरजमा करून प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने PMFME MIS Portal वर अद्ययावत (Upload) करावेत. तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाकडून MIS वर अद्ययावत (Upload) केलेल्या प्रस्तावांची जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षाकडून (DMMU) Random पद्धतीने तपासणी करण्यात यावी.

५.५.: अशाप्रकारे सादर केल्या जाणाऱ्या अर्जाची विविध स्तरावर होणारी पडताळणी व छाननीसाठीची कालमर्यादा महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई निश्चित करील. याबाबतचे सनियंत्रण MSRLM मार्फत केले जाईल.

५.६.: तालुक्यांनी MIS वर अद्ययावत केलेले परिपूर्ण प्रस्तावांची छाननी राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष करेल. छाननी नंतर पात्र लाभार्थ्यांची शिफारस अंतिम यादीसह महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई राज्य नोडल एजन्सीस (SNA) करेल. सदरच्या यादीवर महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांच्या जबाबदार अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. मुळ प्रकल्प प्रस्ताव SRLM स्तरावर व्यवस्थीत ठेवला जाईल यांची काळजी घ्यावी.

५.७.: सदरचे अर्ज हे ऑनलाईन पध्दतीने राज्य नोडल एजन्सीस (SNA) सादर होतील. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांनी शिफारस केलेले अर्ज NRLM Database प्रणाली अंतर्गत PMFME MIS प्रणालीव्दारे सादर करणे आवश्यक आहे. अशा सादर केलेल्या अर्जाची आर्थिक सहाय्यासाठी शिफारस राज्य नोडल एजन्सी (SNA) करेल. त्यानंतर सदरच्या अर्जांना राज्य स्तरीय मंजूरी समिती (SLAC) मान्यता देईल. तथापि केंद्र शासनाचे OM दि.०९.०८.२०२१ अन्वये, बीज भांडवलाच्या पात्र सदस्यांना राज्य नोडल एजन्सीने मान्यता द्यावी. तथापि दि. ०५.०७.२०२२ रोजी पार पडलेल्या SLAC च्या बैठकीमध्ये बीज भांडवल घटकाचे वित्तीय व मंजूरी अधिकार मा. आयुक्त (कृषि) यांना प्रत्यार्पित करण्यात आलेले आहेत. मंजूरीनंतर बीज भांडवल रक्कम राज्य नोडल एजन्सीकडून (SNA) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई कडे वर्ग केली जाईल. तदनंतर राज्य स्तरीय मंजूरी समितीच्या (SLAC) आगामी बैठकीत त्याला कार्योत्तर मान्यता घ्यावी.

## ६. स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना द्यावयाच्या आर्थिक सहाय्याचे प्रमाण :-

६.१.: स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना खेळते भांडवल व छोट्या मशिनरीच्या खरेदीसाठी द्यावयाचे बीज भांडवल कर्ज हे त्यांच्या सध्याच्या व्यवसायाची वार्षिक उलाढाल यावर अवलंबून असेल.

६.२.: अशा प्रकारचे उद्योग/व्यवसाय हे दोन प्रकारचे असू शकतात. एक म्हणजे जे वर्षातील काही महिने (हंगामी) चालू असतात व दुसरे म्हणजे वर्षातील बाराही महिने (कायमस्वरुपी) चालतात. त्यामुळे त्यांना द्यावयाचे कर्ज हे त्यांचा व्यवहार कशा प्रकारे चालतो यावर अवलंबून असेल. खालील तक्त्यामध्ये दिले जाणारे कमाल कर्ज व खेळते भांडवल तसेच साधनांची खरेदी याचा तपशील दिला आहे.

| अ. क्र. | व्यवसाय / उद्योग प्रकार | वार्षिक उलाढाल (रु.) | खेळते भांडवलासाठी कमाल कर्ज रु. | मशिनरी खरेदीसाठी कमाल कर्ज रु. | एकूण कमाल कर्ज रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ (४+५) |
| १) | हंगामी उद्योग | X | X च्या १००% | X च्या ४०% | ४००००.०० |
| २) | बारमाही उद्योग | X | X च्या ५०% | X च्या ४०% | ४००००.०० |

६.३.: **हंगामी** उद्योगाच्या बाबतीत जर आर्थिक उलाढाल रु.२००००/- असेल तर खेळते भांडवलासाठी रु.२००००/- च्या १००% म्हणजेच रु. २००००/- कर्ज दिले जाईल. तसेच मशिनरी खरेदीसाठी रु.२००००/- च्या ४०% म्हणजेच रु. ८०००/- कर्ज दिले जाईल. म्हणजेच गटातील सदस्यास एकूण

रु. २८०००/- चे कर्ज मिळेल. जर **बारमाही (कायमस्वरुपी**) उद्योगाची उलाढाल रु.२००००/- असेल तर खेळते भांडवलासाठी रु.२००००/- च्या ५०% म्हणजेच रु. १००००/- कर्ज दिले जाईल. तसेच मशिनरी खरेदीसाठी रु.२००००/- च्या ४०% म्हणजेच रु. ८०००/- कर्ज दिले जाईल. म्हणजेच गटातील सदस्यास एकूण रु. १८०००/- चे कर्ज मिळेल. (केंद्र शासनाच्या (www.nrlm.gov.in) या संकेतस्थळावरील MIS Portal वेळोवेळी विहित केलेप्रमाणे बदल होऊ शकतो.)

६.४.: वरील तक्त्यामध्ये दिल्यानुसार हंगामी व बारामाही अशा दोन्ही प्रकारच्या उद्योगांना खेळते भांडवल व छोट्या मशिनरीच्या खरेदीसाठी कमाल रु.४००००/- च्या मर्यादेत कर्ज दिले जाईल.

६.५.: <u>महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई व त्यांच्या जबाबदार यंत्रणांना वितरीत करावयाचा निधी :-</u>

६.५.१.: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई अभियानांतर्गत राज्यस्तरावर PMFME योजनेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यात यावे व त्यांचा तपशील SNA ला सादर करावा.

६.५.२.: बीज भांडवल वितरणाचा निधी राज्य नोडल एजन्सी कडून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांचेकडे PFMS प्रणालीव्दारे वितरीत करण्यात येईल. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष बीज भांडवल प्राप्त निधी PFMS प्रणालीनुसार प्रभागसंघ/ग्रामसंघ (समुदाय संस्था) यांच्या खात्यावर वर्ग करील. समुदाय संस्थांकडून सदरचा निधी संबंधित स्वयं सहाय्यता गटांच्या सदस्यांना वितरीत करण्यात येईल. MSRLM कडील या समुदाय संस्था समुदाय निधी जसे की समुदाय गुंतवणूक निधी (कम्युनिटी इनव्हेस्टमेंट फंड) व समुदाय उद्योग निधी (कम्युनिटी एंटरप्राईज फंड) याचे व्यवस्थापन करतात. त्याप्रमाणे समुदाय निधीचे वितरण व व्यवस्थापन करण्याची पद्धत समुदाय संस्थांकडे (CBOs) प्रचलित आहे. त्याच धर्तीवर PMFME योजनेंतर्गत प्राप्त होणा-या बीज भांडवलाचे व्यवस्थापन NRLM अंतर्गत दिल्या जाणा-या CIF/CEF प्रमाणे करण्यात यावे. प्राप्त निधीचा विनियोग या योजनेअंतर्गत निश्चित केलेल्या हेतूसाठीच/कारणांसाठीच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांनी खर्च केला हि पाहीजे याची दक्षता घेतली जाईल. याबाबतचे सर्व लेखे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई व जिल्हास्तरावर ठेवले जातील.

६.५.३.: बीज भांडवलाची रक्कम जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष (DMMU), यांचे मार्फत समूदाय संस्थांना/समूहस्तरीय संघ (CBO/VO/CLF) व पुढे स्वयंसहाय्यता गटांना (SHGs) व अंतिमत: गटातील सदस्यांना वितरीत होईल.

६.६.: <u>स्वयंसहाय्यता गटांना द्यावयाच्या कर्जावरील व्याजदर :-</u>

या योजनेअंतर्गत गटातील लाभार्थी सदस्यांकडून जास्तीत जास्त ६% व्याज आकारले जाईल. तसेच मिळणाऱ्या व्याजाची विभागणी स्वयंसहाय्यता गट, गावस्तरीय संस्था व समूहस्तरीय संघाला (Federation) कशा प्रकारे केली जाईल याचा निर्णय महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई घेईल. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्यात सदरचे बीज भांडवल समुदाय संस्थेसाठी संपूर्णत: अनुदान स्वरूपात असून लाभ घेणाऱ्या समुह उद्योजकांसाठी हे बीज भांडवल वार्षिक ३% या व्याजदराने कर्ज स्वरूपात असणार आहे. सदर कर्जाचा परतावा करताना व्याजाची विभागणी १% स्वयंसहाय्यता समूह, १% ग्रामसंघ व १% प्रभागसंघ या प्रमाणात करण्यात येत आहे. सदर बीज

भांडवल विनियोगाचा कालावधी एक वर्षाचा राहिल. तथापि, काही अपवादात्मक परिस्थितीत त्यामध्ये सहा महिन्यापर्यंत मुदतवाढ देण्याचा अधिकार संबधित निधी वितरण समुदाय संस्थेला राहील. जिल्हा/तालुका व्यवस्थापन कक्षाकडून बीज भांडवलाचा विनीयोग फक्त मान्यता प्राप्त अन्न प्रक्रिया उद्योगासाठीच केला जाईल याची दक्षता घ्यावी. समुदाय संस्थेकडे परतफेड केलेल्या बीज भांडवलाचा उपयोग इतर पात्र अन्न प्रक्रिया उद्योजकांसाठी करावा. त्यासाठी सध्याच्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

७. अहवालांचे सादरीकरण व अनुपालन यंत्रणा (Compliance Mechanism) :-

७.१.: योजनेअंतर्गत येणाऱ्या निधीची नोंद करण्यासाठी प्रभागसंघ, ग्रामसंघ व स्वयंसहाय्यता गट यांच्या स्तरावर स्वतंत्र खातेवही (Ledger) ठेवली जाईल. याबाबतचा अहवाल महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई दरमहा राज्य नोडल एजन्सीला (SNA) सादर करील.

७.२.: योजनेतील तरतूदीनुसार व आवश्यकतेनुसार महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई आवश्यक सर्व अहवाल/कागदपत्रे केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) मध्ये अपलोड करील. स्वयं सहाय्यता गटातील सदस्यांपासून ते MSRLM स्तरापर्यंत, माहिती अपलोड (upload) करण्याची (MIS) सर्व जबाबदारी MSRLM ची राहील.

७.३.: समुदाय संसाधन व्यक्ती व गावस्तरीय संस्थांना योजनेच्या ज्या उद्देशासाठी नेमले आहे, त्यासाठी त्यांचा पुरेपूर उपयोग होईल याची खात्री महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांनी दिली पाहिजे. योजनेच्या प्रत्येक लाभार्थांकडून घोषणापत्र (डिक्लेरेशन) घेवून ते राष्ट्रीय ग्रामीण अजीविका अभियान (NRLM) च्या माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये अपलोड केले पाहीजे.

७.४.: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई त्यांच्या चमूमधील (Team) लोकांना माहिती व्यवस्थापन प्रणाली मध्ये माहिती भरणे व नोंदणी अद्यावत करणे/वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी/सुरक्षा प्रमाणके/FSSAI नोंदणी याबाबत प्रशिक्षण देईल. आवश्यकतेनुसार हे चमू (Team) सदस्य स्वयंसहाय्यता गट / गटातील सदस्य यांना वरील बाबीसंदर्भात सहाय्य करतील.

७.५.: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांनी बीज भांडवल घेणाऱ्या सर्व लाभार्थांच्या संबंधी खालील बाबींची खात्री करेल.

अ) लाभार्थांची निवड करणे व त्यांचे संनियंत्रण करणे व लेखे ठेवणे.

आ) लाभार्थांकडून बीज भांडवल रक्कमेचा वापर.

इ) कर्जाशी निगडीत अनुदान घेण्यासाठीचे अर्ज व लाभार्थांची पात्रता याचा योग्यप्रकारे निवड करणे.

७.६.: योजनेच्या माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) मध्ये योग्य प्रकारे माहिती घेतली जाते याची खात्री महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांनी दिली पाहीजे. यासंबंधीची प्रपत्रे (Format) राष्ट्रीय ग्रामीण अजीविका अभियान (NRLM) तयार करील व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांना उपलब्ध करुन देईल. या प्रपत्रांबाबतची माहिती

राज्य नोडल एजन्सी (SNA), पुणे ला देखील दिली जाईल. तसेच MIS Portal वरील अहवालासाठी SNA कार्यालयास युजरनेम (Username) व पासवर्ड (Password) वापरणेकरिता (Access) देण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांनी लाभार्थी द्विरुक्ती होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. लाभार्थीने या अगोदर याचा लाभ इतर योजनेतून घेतला नाही याची खात्री करण्यात यावी. लाभार्थीस लाभ एकदाच देण्यात यावा. गैरव्यवहार झाल्यास संबंधीतावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

८. सनियंत्रण व मूल्यमापन :-

१) राज्य नोडल एजन्सीकडून प्राप्त निधीचे लेखे राज्य, जिल्हा व समुदाय स्तरावर बंधनकारक करण्यात येत आहे.

२) उद्योजकांना वितरीत बीज भांडवल निधीचा विनीयोग विहीत पध्दतीने होत असल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी MSRLM ची राहील.

३) जिल्हयामार्फत ऑनलाईन करण्यात आलेल्या प्रस्तावांची माहिती जिल्हास्तरीय यंत्रणेला उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत सर्व माहिती वेळोवेळी अद्यावत व ऑनलाईन करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाची राहील.

५) केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे लेखापरिक्षण/उपयोगिता प्रमाणपत्र, इत्यादी बाबी व कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक: प्रकृसिं-०५२०/ प्र.क्र.५८/१४अे, दि. ०१/०१/२०२१ मधील मुद्दा क्रमांक ८ नुसार, सदर निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/प्रक्रियाचे/वित्तीय अधिका-यांच्या मर्यादेत/C.V.C तत्वानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाची राहील.

*****

# मार्गदर्शक सूचना - सन २०२३-२४

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत (PMFME)

## स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांसाठी बीज भांडवल **(Seed Capital)**

## VOCAL FOR LOCAL

### दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (DAY-NULM)

१. पार्श्वभूमी :-

१.१. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजने (PMFME) बाबत -

केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली यांच्यामार्फत आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत "प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना"(PMFME) सुरु झाली आहे. या योजनेअंतर्गत नवीन तथा सध्या कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांची स्तरवृद्धी करण्याच्या दृष्टीने व या असंघटित (Unorganized) क्षेत्रास औपचारिक (Formalized) स्वरुप प्राप्त करुन देण्यासाठी सहाय्य दिले जाईल. योजनेची अंमलबजावणी सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत केली जाणार आहे. सदर योजनेकरिता देशासाठी १०००० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

a. शहरी भागातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यास लहान साधने/छोट्या औजारांची (Small Tools) खरेदी व खेळते भांडवल यासाठी कमाल रु. ४०,०००/- प्रति सदस्य व प्रति स्वयंसहाय्यता गट कमाल रक्कम रु.४,००,०००/- या मर्यादेतच अर्थसहाय्य दिले जाईल. (MoFPI चे दिनांक ११/०२/२०२२ रोजीचे OM)
b. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील स्वयंसहाय्यता गट व तसेच गटातील वैयक्तिक सदस्यास भांडवली गुंतवणूकीकरिता पात्र प्रकल्प किंमतीच्या ३५% व कमाल रु.१० लाखाच्या मर्यादेत बँक कर्जाशी निगडीत अनुदान दिले जाईल. MoFPI, **नवी दिल्ली यांचे दिनांक २१/१०/२०२१ रोजीचे OM नुसार बीज भांडवल या घटकाचा लाभ ज्या गटांनी / गटातील सदस्यांनी घेतला आहे त्यांनासुद्धा या बाबीचा तसेच प्रशिक्षण, सामाईक पायाभूत सुविधा (CIF) व मार्केटिंग व ब्रँडींगचा लाभ घेता येईल.**
c. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील शेतकरी उत्पादक गट/कंपनी/संस्था, स्वयं सहाय्यता गट, उत्पादक सहकारी संस्था व अशासकीय संस्था भांडवली गुंतवणूकीकरीता पात्र प्रकल्प किंमतीच्या ३५% कमाल रक्कम रु.१०.०० लाख अनुदान देय आहे. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली यांचा दि. ०१.०७.२०२२ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनानूसार (OM) SULM मार्फत भांडवली गुंतवणूकीसाठी बँक कर्जाशी निगडीत अनुदान (Credit Linked Grant) हा घटक राबविण्याचे सूचित करण्यात आलेले आहे.

   सदर सूचनांन्वये, उमेद अभियानात स्वयं सहाय्यता गटांना सहाय्य देण्यासाठी कार्यरत समुदाय संसाधन व्यक्ती यांच्यामधून सद्यस्थितीत प्रती जिल्हा १० जिल्हा संसाधन व्यक्तींची निवड करणे. सदर निवड केलेल्या DRP यांना PMFME पोर्टल वर अर्ज दाखल करणेसाठी MoFPI, नवी दिल्ली मार्फत Login Credential उपलब्ध करुन देण्यात येतील. विविध टप्प्यावर लाभार्थी अर्ज एकत्रित करणे, कर्ज मंजूरी, प्रकल्पाचे औपचारिकीकरण

(Formalization) आणि प्रकल्प कार्यान्वित करणे (Operationalization), इत्यादी जबाबदारी निवडलेल्या DRP यांची राहील.

d. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली यांचा दिनांक ०२.०९.२०२२ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनानूसार (OM) बीज भांडवल प्राप्त लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात येईल.
e. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना त्यांच्या उत्पादनांचे ब्रँडींग व विपणनासाठी पात्र प्रकल्प किंमतीच्या ५०% अनुदान देय आहे.
f. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांतील सदस्यांना प्रशिक्षण व क्षमता बांधणी यासाठी १००% अनुदान देय आहे.
g. "एक जिल्हा एक उत्पादन"(ODOP) व Non ODOP उद्योगांना अर्थसहाय्य मिळेल. "एक जिल्हा एक उत्पादन"(ODOP) उद्योगांना प्राधान्य असेल.

१.२. दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (DAY-NULM) बाबत -

गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय (MoHUA) मार्फत दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (DAY-NULM) राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता गट (SHGs) आणि त्यांच्या संघ (Federations) सारख्या समुदाय आधारित संस्थांच्या निर्मितीद्वारे शहरी गरीब कुटुंबातील गरिबी व असुरक्षितता नष्ट करण्यासाठी झोपडपट्टी (Slum) किंवा प्रभाग (Ward ) स्तरावर वस्ती स्तरीय संघ (Area Level Federations) (ALFs) व शहर स्तरावर शहर स्तरीय संघ (City-Level Federations (CLFs) या सारख्या समाज आधारीत संस्था तयार करण्यात आलेल्या आहेत.

या अभियानांतर्गत स्वयंसहाय्यता गट व त्यांचे संघ यांना स्वयंरोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारण्यास आर्थिक व हाताळणी सहाय्य केले जाते. त्यापैकी काही अन्न प्रक्रिया क्षेत्रात गुंतलेले आहेत. PMFME योजनेचा विस्तारीत लाभ शहरी भागातील स्वयंसहाय्यता गट/फेडरेशनला देण्यासाठी (DAY-NULM) अंतर्गत राज्य नागरी उपजीविका अभियान (SULM) यांच्यामार्फत राबविणे आवश्यक आहे.

MoFPI आणि MoHUA द्वारे दिल्या जाणा-या सेवांचे अभिसरण (convergence) सुनिश्चित करण्यासाठी संयुक्त पत्र **परिशिष्ट** - A मध्ये दिले आहे.

२. दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (DAY-NULM) योजनेतील घटक :-

२.१. बीज भांडवल -

राज्यात योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य नोडल एजन्सीची (SNA), पुणे असेल. उत्पादक स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना बीज भांडवल या उपघटकाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य नागरी उपजीविका अभियान (SULM) यांच्याकडे असेल. स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना खेळते भांडवल व छोटया औजारांची खरेदी याकरीता सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगाशी संबंधीत सदस्यांना कर्ज किंवा गूंतवणूक/ भांडवल (Seed Capital) म्हणून फेडरेशन मार्फत कमाल रु.४०,०००/- प्रति सदस्य किंवा कमाल रु. ४,००,०००/- प्रति स्वयं सहाय्यता गट अनुज्ञेय राहील.

सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये कार्यरत असलेले स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना योजनेअंतर्गत राज्य नागरी उपजीविका अभियान (SULM) मार्फत वस्ती स्तरीय संघांना (ALF) निधी अनुदान म्हणून उपलब्ध होईल. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये कार्यरत स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांनाच बीज भांडवल उपलब्ध होईल. अशाप्रकारे, स्वयंसहाय्यता गटांच्या संघस्तरावर (Federation) बीज भांडवल देण्यात येईल. SULM द्वारे हा निधी वस्ती स्तरीय संघ (ALF) या स्तरावर अनुदानाच्या स्वरुपात दिला जाईल व या संस्था स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना प्राप्त निधी कर्ज स्वरुपात देतील व स्वयंसहाय्यता गटांचे सदस्य ती रक्कम स्वयंसहाय्यता गटांना परतफेड करतील.

संघ (Federation) स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना सदर निधी कर्ज म्हणून वितरीत करेल. अशा कर्जावरील व्याजदराचे प्रमाण हे संबंधित फेडरेशन ठरवू शकते, परंतु ते वार्षिक ६ टक्क्यांपेक्षा जास्त नसावे. यातील ३% स्वयंसहाय्यता गटाच्या कर्जाच्या व्यवस्थापनासाठी राखून ठेवली जाईल.स्वयंसहाय्यता गटातील सदस्य/लाभार्थी त्यांच्या संबंधित स्वयंसहाय्यता गटांद्वारे सदर कर्जाची रक्कम वस्ती स्तरीय संघ (ALF)/शहर स्तरीय संघ (CLF) यांना परतफेड करेल. सदस्यांकडून परतफेड झालेले कर्ज हे संघ स्तरावर स्थायी निधी (Corpus Fund) म्हणून त्यांच्याकडे जमा होईल व त्याचा वापर स्वयंसहाय्यता गटाच्या भविष्यातील उपजिवीका विकासासाठी केला जाईल. कॉपर्स फंडात परतफेड केलेले बीज भांडवल हे वैयक्तिक आणि गटासाठी १०% लाभार्थी स्वःहिस्सा (Beneficiary contribution) व स्वयं सहाय्यता गटांना (SHGs) खेळत्या भांडवलासाठी २०% मार्जिन मनी म्हणून वापरु शकतात (OM-दिनांक. ०१.०७.२०२२).

२.१.१. <u>स्वयंसहाय्यता गटासाठी बीज भांडवल -पात्रता / निकष</u> : -

I. स्वयंसहाय्यता गटातील जे सदस्य कार्यरत अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये सध्या सहभागी आहेत तेच बीज भांडवलाच्या सहाय्यासाठी पात्र असतील.

II. स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांनी स्वयंसहाय्यता गटास व स्वयंसहाय्यता गटांच्या संघास (Federation) खात्री दिली पाहीजे की, मिळालेल्या रक्कमेचा वापर केवळ अन्न प्रक्रिया उपक्रमासाठीचे खेळते भांडवल व लहान मशिनरी खरेदी करण्यासाठीच केला जाईल.

III. जे स्वयंसहाय्यता गट "एक जिल्हा एक उत्पादन" (ODOP) धोरणानुसार निवडलेल्या उत्पादनावर काम करीत असतील अशा स्वयंसहाय्यता गटांना प्राधान्य दिले जाईल.

IV. बीज भांडवल देण्यापूर्वी स्वयंसहाय्यता गटांचे संघ खालीलप्रमाणे स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांची सविस्तर प्राथमिक माहिती जमा करेल.

अ) स्वयंसहाय्यता गटातील सर्व सदस्यांची सविस्तर माहिती

ब) प्रक्रिया केल्या जाणा-या उत्पादनाची सविस्तर माहिती

क) स्वयंसहाय्यता गटांमार्फत राबविले जाणारे इतर उपक्रम

ड) वार्षिक उलाढाल

इ) कच्च्या मालाची उपलब्धता व उत्पादनाची विक्री, इ.माहितीचा समावेश असेल.

V. शासनाने सूचित केल्याप्रमाणे अपंगांसाठी ५ % निधी राखीव ठेवला जाईल.

VI. महाराष्ट्र शासनाने महिला धोरण - २०१४ पासून स्वीकारले असून त्याप्रमाणे जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यात यावी व त्याचे अहवाल संबंधितांना पाठविण्यात यावे.

VII. सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची द्विरुक्ती होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

VIII. सदर बाबतचे लेखे जिल्हास्तरावर जतन करण्यात येऊन लेखापरिक्षणाचे वेळेस सादर करावेत.

२.१.२. अर्ज प्रक्रिया:-

I. स्वयंसहाय्यता गटांच्या पात्र आणि इच्छुक सदस्यांना योजनेअंतर्गत **लाभ घेण्यासाठी** विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. **(जोडपत्र बी - फार्म १, २ व ३ )**

II. स्वयंसहाय्यता गटांतील सदस्य आणि स्वयंसहाय्यता गटांकडून प्राप्त झालेले अर्ज समुदाय संघटक (CO)/समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) यांच्या सहाय्याने SHG च्या बैठकांमध्ये मंजूर केले जातील आणि वस्ती स्तरीय संघ (ALF)/शहर स्तरीय संघ (CLF) ला पाठवले जातील. **(अर्ज मंजुरीचे प्रपत्र-परिशिष्ठ-D).** या टप्प्यावर स्व-घोषित उलाढालीची तपासणी केली जाईल.

III. ALFs/ CLFs अर्जांची छाननी करतील आणि त्यांच्या शिफारशींसह सदर अर्ज ULB ला सादर करतील. **(अर्ज मंजुरी प्रपत्र -परिशिष्ट- E )**

IV. CMMU (शहर अभियान व्यवस्थापन कक्ष) द्वारे मंजूर केलेले अर्जांची नोंदणी DAY-NULM ने तयार केलेल्या PMFME MIS Portal वर केली जाईल.

V. छाननी नंतर पात्र लाभार्थ्यांची शिफारस अंतिम यादीसह राज्य नागरी उपजीविका अभियान (SULM), नवी मुंबई, राज्य नोडल एजन्सीस (SNA) करेल. सदरच्या यादीवर राज्य नागरी उपजीविका अभियान (SULM), नवी मुंबई च्या जबाबदार अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. मुळ प्रकल्प प्रस्ताव SULM स्तरावर व्यवस्थीत ठेवला जाईल, याची काळजी घ्यावी.

VI. लाभार्थी/गटांची मंजूर यादी आणि बीज भांडवल रक्कम राज्य नोडल एजन्सीकडून (SNA) राज्य नागरी उपजीविका अभियान (SULM), नवी मुंबई यांच्याकडे वर्ग केली जाईल.

VII. SULM स्तरावर प्राप्त निधी संबंधित संघाच्या बँक खात्यावर १० दिवसांत वितरित केला जाईल व तद्नंतर सदर निधी संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात २ आठवड्यांच्या आत पोहचणे आवश्यक आहे.

२.१.३ स्वयंसहाय्यता गटांना द्यावयाच्या आर्थिक सहाय्याचे प्रमाण :-

स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना खेळते भांडवल व मशिनरीच्या खरेदीसाठी द्यावयाचे कर्ज हे त्यांच्या सध्याच्या व्यावसायाची वार्षिक उलाढाल यावर अवलंबून असेल. **(परिशिष्ट - B मध्ये दिल्याप्रमाणे)** खालील तक्त्यामध्ये दिले जाणारे कमाल कर्ज व खेळते भांडवल तसेच साधनांची खरेदी याचा तपशील दिला आहे.

| अ. क्र. | वार्षिक उलाढाल (रु.) | खेळते भांडवलासाठी कमाल कर्ज रु. (A) | मशिनरी खरेदीसाठी कमाल कर्ज रु. (B) | देय कर्ज रक्कम रू. | एकूण कमाल कर्ज रु. |
|---|---|---|---|---|---|
| १) | X | X च्या ५०% | X च्या ४०% | (A+B) | ४००००/- |

जर उद्योगाची उलाढाल रु. २००००/- असेल तर खेळते भांडवलासाठी रु.२००००/- च्या ५०% म्हणजेच रु. १००००/- कर्ज दिले जाईल. तसेच मशिनरी खरेदीसाठी रु.२००००/- च्या ४०% म्हणजेच रु.८०००/- कर्ज दिले जाईल. म्हणजेच गटातील सदस्यास एकूण रु.१८०००/- चे कर्ज

मिळेल. म्हणजेच गटातील सदस्यास एकूण रु. १८०००/- चे कर्ज मिळेल. (केंद्र शासनाच्या MIS Portal मध्ये वेळोवेळी विहित केलेल्या बदलानुसार यामध्ये बदल होऊ शकतो.)
वरील तक्त्यामध्ये दिल्यानुसार खेळते भांडवल व मशिनरीच्या खरेदीसाठी रु. ४०,०००/- च्या मर्यादेत कमाल कर्ज दिले जाईल.

## २.२ भांडवली गुंतवणुकीसाठी पत आधारीत अनुदान (Credit Linked Subsidy for Capital Investment) -

सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील स्वयंसहाय्यता गट संघास (Federation) भांडवली गुंतवणूकीकरिता पात्र प्रकल्प किंमतीच्या ३५% अनुदान देय आहे. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील स्वयंसहाय्यता गटाच्या वैयक्तिक सदस्यास किंवा स्वयंसहाय्यता गटांना भांडवली गुंतवणूकीकरिता पात्र प्रकल्प किंमतीच्या ३५% व कमाल रु.१० लाखाच्या मर्यादेत बँक कर्जाशी निगडीत अनुदान दिले जाईल. प्रकल्पाची किंमत ही अर्जदाराने सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाच्या (DPR) आधारे ठरवली जाते. स्वयंसहाय्यता गटाच्या वैयक्तिक सदस्यांनी PMFME Website- https://pmfme.mofpi.gov.in/pmfme MIS Portal वर Online अर्ज सादर करू शकतात. प्रकल्प मंजूर करण्याची प्रक्रिया मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि PMFME योजनेअंतर्गत जारी केलेल्या सूचनेनुसार होईल .

### २.२.१ गट/स्वयंसहाय्यता गट/स्वयंसहाय्यता गटांचे संघ यासाठी पात्रता/निकष -

स्वयंसहाय्यता गटांकडे प्रकल्प खर्चाच्या १०% आणि खेळते भांडवलासाठी २०% मार्जिन मनी यासाठी पुरेसा स्वतःचा निधी असावा किंवा राज्य सरकारच्या अनुदानाप्रमाणे त्यास मंजुरी असावी. कॉपर्स फंडात परतफेड केलेले बीज भांडवल हे वैयक्तिक आणि गटासाठी १०% लाभार्थी स्वःहिस्सा (Beneficiary contribution) व स्वयं सहाय्यता गटांना (SHGs) खेळत्या भांडवलासाठी २०% मार्जिन मनी म्हणून वापरु शकतात (Ref-MoFPI, New Delhi-OM - दि. ०१.०७.२०२२).

### २.२.२ गट/स्वयंसहाय्यता गट/स्वयंसहाय्यता गटांचे संघासाठी प्रक्रिया -

I. राज्य नागरी उपजीविका अभियान (SULM), नवी मुंबई हे CMMU द्वारे जे सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये अनुदानसाठी पात्र आहेत आणि आधुनिकीकरण करण्याची क्षमता आहे अशा गट/स्वयंसहाय्यता गट/स्वयंसहाय्यता गटांचे संघ यांचा शोध घेतील. CRP/CO/CMM सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांची क्षेत्रिय तपासणी करून संबंधित तपशीलांसह एक यादी तयार करेल. PMFME योजनेच्या श्रेणी सुधारणा (potentials of upgradation) व योजनेच्या फायद्यांवर DRP द्वारा ओळखल्या जाणाऱ्या सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना शहर स्तरावर सामान्य ओळख (general orientation) मिळणार आहे. त्यासाठी SULM/CMMU द्वारे अभिमुखता कार्यक्रमासाठी (orientation program) समन्वय केला जाईल.

II. शहर अभियान व्यवस्थापन कक्ष (CMMU) यांनी तयार केलेल्या आणि ULB (Urban Local Body) ने मंजूर केलेल्या सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांची यादी राज्य नागरी उपजीविका अभियान (SULM),नवी मुंबई यांना सादर केली जाईल. ओळखलेल्या सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांची एकत्रित यादी SULM द्वारे योग्य तपासणीनंतर, SNA, पुणे यांना प्रस्तावासह सादर केली जाईल. DPR तयार करण्यासाठी योजनेअंतर्गत रक्कम रु. २०,०००/- ची हातमिळवणी सहाय्य मिळू शकते.

III. राज्य नागरी उपजीविका अभियान (SULM) संभाव्य सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगाला राज्य स्तरीय तांत्रिक संस्था (SLTIs) आणि क्षेत्रातील इतर संसाधने/DPR तयार करणे, व्यवसाय/उत्पादन नियोजन आणि नवीन तंत्रज्ञानाच्या आवृत्त्या/संधी स्वीकारण्यासाठी तज्ञांशी जोडण्याची सोय करेल.

IV. अर्ज मंजुरीची प्रक्रिया PMFME योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार असेल.

२.३. <u>सामाईक पायाभूत सुविधांसाठी अर्थसहाय्य (Support for Common Infrastructure)-</u>

सामाईक पायाभूत सुविधांसाठी शेतकरी उत्पादक संस्था (FPO)/शेतकरी उत्पादक कंपनी (FPC), सहकारी संस्था (Co-operative), स्वयंसहाय्यता गट (SHGs) स्वयंसहायता गटांचे फेडरेशन, (उदा.MSRLM-CLF, MAVIM-VLF, CMRC/NULM-ALF) शासकीय संस्था ODOP किंवा NON-ODOP साठीचे प्रस्ताव सहाय्यासाठी पात्र आहेत. तथापि ODOP प्रस्तावांना प्राधान्य दिले जाईल.

सामाईक पायाभूत सुविधा, विपणन आणि ब्रँडिंग या घटकाअंर्तगत ODOP आणि तसेच Non ODOP आधारीत सूक्ष्म अन्न प्रक्रिया प्रकल्पांच्या उत्पादनांना अर्थसहाय्य दिले जाईल. योजनेअंतर्गत तयार करण्यात आलेले सामाईक पायाभूत सुविधा इतर युनिट्ससाठी आणि सार्वजनिकरीत्या पूर्ण क्षमतेने वापर होणेसाठी भाडेतत्वावर वापरण्यासाठी उपलब्ध असावे. या श्रेणीतील प्रकल्पाची पात्रता ही शेतकरी आणि उद्योगाला होणा-या मोठ्या प्रमाणावर लाभ, व्यवहार्यता अंतर (viability gap), खाजगी गुंतवणूकीची अनुपस्थिती (absence of private investment), मूल्य साखळीची गंभीरता (criticality to value chain) इत्यादींवर आधारीत ठरवली जाईल. अशा प्रकल्पांना विहित केल्याप्रमाणे @ ३५% बँक कर्जाशी निगडीत अनुदानाची कमाल मर्यादा रक्कम रु. ३.०० कोटी देय राहील. अर्ज आणि पात्रतेची प्रक्रिया योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि सामाईक पायाभूत सुविधांसाठी जारी केलेल्या इतर सूचनांनुसार असेल.

२ १.३. <u>NULM अंतर्गत SHG फेडरेशनसाठी पात्रता निकष</u> :-

१. इच्छुक SHG फेडरेशन किंवा SHG फेडरेशनद्वारे संचालित नोंदणीकृत सीएलसी उदा. ALF/CLF मदतीसाठी पात्र असेल.
२. सामाईक पायाभूत सुविधांसाठी ODOP तसेच Non ODOP उत्पादनांसाठी अर्थसहाय्य प्रदान केले जाईल.
३. अर्जदार प्रकल्पाच्या किंमतीच्या १० % स्वतःचा निधी जमा करण्यास सक्षम असावा.

२.३.२. <u>प्रक्रिया</u> -

१. शहर अभियान/सिटी मिशन SULM ला पात्र CLCs किंवा ALF/ CLF ओळखण्यास मदत करेल.
२. SULM हे ULBs शी सल्लामसलत करून SNA च्या विचारासाठी आणि प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी निधी मिळविण्यासाठी एक संक्षिप्त योजना तयार करेल. यात संक्षिप्तमध्ये प्रत्येक शहरासाठी प्रस्तावित उत्पादनांचा तपशील, प्रस्तावित तंत्रज्ञान, प्रस्तावित CLC/SHG/ALF/CLF चे प्रोफाइल, अंदाजे खर्च इत्यादीची माहिती असेल. या योजनेअंतर्गत

प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी प्रति प्रकल्प रक्कम रु. ५०,००० मदत अनुज्ञेय आहे.

३. प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी निधी मिळवण्यासाठी आणि रक्कम हस्तांतरित करण्यासाठी SNA पात्र असलेल्या युनिट्सची यादी अंतिम करेल. SULM अर्जदार संस्थेला ULBs द्वारे प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी संबंधित निधी त्वरीत हस्तांतरित करेल.
४. शहर स्तरावर तयार केलेला प्रकल्प अहवाल (DPR) पुढील प्रक्रियेसाठी SULM द्वारे SNA ला सादर केला जाईल. मंजूर प्रकरणांमध्ये अनुदानाचे वितरण नोडल वित्तीय संस्था च्या माध्यमातून अर्जदार संस्थेच्या बँक खात्यात जमा होईल.
५. अर्ज मंजुरीची प्रक्रिया PMFME योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार असेल.

२.४ <u>योजनेअंतर्गत इतर समर्थन प्रणाली</u> -

२.४.१ <u>प्रशिक्षण आणि हाताळणी</u> -

PMFME योजनेअंतर्गत क्षमता निर्माण सहाय्य लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी वापर करण्यात येईल. अन्नप्रक्रिया उपक्रम चालवण्यासाठी SULM ला त्याच्या SHGs/फेडरेशनला क्षमता वाढवण्यासाठी प्रशिक्षित करण्याची आवश्यकता असल्यास, SNA ला प्रस्तावित केले जाऊ शकते.

(MoFPI,नवी दिल्ली यांचे दि.१८/०७/२०२२ रोजीचे कार्यालयीन ज्ञापनाद्वारे (OM) बीज भांडवल घटक राबविण्यासाठी हाताळणी सहाय्य खर्च रु. २४३७/- प्रति उद्योग (Enterprise) निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर निधी पहिला टप्पा- रु.१०००/- व दुसरा टप्पा रु. १४३७/- असे दोन टप्प्यांमध्ये वितरीत करण्यात येणार आहे.)

२.४.२. <u>ब्रँडिंग, विपणन व IEC</u> -

PMFME योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ब्रँडिंग, विपणन आणि IEC सारखे इतर सहाय्य प्रदान केले जाईल. आवश्यकता असल्यास SULM ब्रँडिंग, विपणन आणि IEC चा प्रस्ताव विचारात घेण्यासाठी आणि अतिरिक्त निधीच्या मंजुरीसाठी SNA कडे सादर करु शकते. या योजनेंतर्गत FPOs/SHGs/Co-Operative संस्थांच्या गटांना किंवा सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांच्या SPV ला विपणन आणि ब्रँडिंग सहाय्य प्रदान केले जाईल.

३. <u>अनुपालन यंत्रणा आणि अहवाल देणे</u> -

१. PMFME MIS वर अपलोड करण्यासह विविध घटकांअंतर्गत निधीचे तपशील मिळवण्यासाठी ALFs/CLFs आणि SHGs द्वारे स्वतंत्र लेजर ठेवणे आवश्यक आहे.
२. SULM द्वारे मासिक अहवाल SNA ला सादर केले जावेत.
३. निधी वापराबाबतची घोषणा प्रत्येक PMFME लाभार्थीकडून घेतली जाईल आणि DAY-NULM MIS वर त्याचा तपशील अपलोड केला जाईल, त्यासाठी आवश्यक तरतूद केली जाईल.

*****

# मार्गदर्शक सुचना
# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)
# क्षमता बांधणी घटकासाठी अर्थ सहाय्य सन २०२३-२४
## Guidelines for Capacity Building Component
## Vocal for Local.....Local to Global

केंद्र शासनाच्या क्षमता बांधणी घटकासाठी सुधारित मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाचा OM दि. ०२.०९.२०२२ प्राप्त असून या संदर्भात कृषी आयुक्तालयाचे पत्र ३३८६७ दि. ०७.०९.२०२२ रोजी परीपत्रीत करण्यात आले आहे.

<u>क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचा उद्देश:</u>

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PMFME) योजनेंतर्गत क्षमता बांधणी व प्रशिक्षण हा महत्वाचा घटक आहे. क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचा उद्देश

१. नवीन आणि कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजक (ODOP & Non-ODOP) यांची उद्योजकीय क्षमता बळकट करणे.
२. अन्न प्रक्रिया उद्योगातील अन्न उत्पादने हाताळणे, अन्न सुरक्षा, स्वच्छता या विषयाबाबत प्रशिक्षण देणे.
३. अन्न प्रक्रिया उद्योगातील व्यवसाय संधी ओळखणे, व्यावसायिक आराखडा तयार करणे, उद्यम (उदयोग आधार) व FSSAI प्रमाणपत्र प्राप्त करणे तसेच GST (आवश्यक तेथे) परवाने बाबत माहिती देणे.
४. उत्पादन विकास - साठवणूक, मूल्यवर्धन,उत्पादन प्रक्रिया तंत्रज्ञान, मशिनरी, पॅकेजिंग, ब्रडिंग आणि मार्केटिंग, अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता मानके बाबत अवगत करणे.

१. क्षमता बांधणी आराखडा :-(Capacity Building Framework)

अन्न प्रक्रिया उद्योजक, वैयक्तिक लाभार्थी, महिला बचत गट/ शेतकरी उत्पादक संस्था (FPO) / उत्पादक सहकारी संस्था यासारखे विविध गट तसेच शासकिय अधिकारी, प्रकल्पामधील अधिकारी व जिल्हा संसाधन व्यक्ती यांना योजनेचे प्रशिक्षण देणे आहे.

खालीलप्रमाणे लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल.

अ) जिल्हास्तरीय समितीने (DLC) शिफारस केलेल्या प्रकल्प प्रस्तावातील वैयक्तिक व गट लाभार्थी प्रशिक्षणास पात्र राहतील. जिल्हास्तरीय समितीने (DLC Recommended) शिफारस केलेल्या प्रस्तावांमध्ये बँकेने कर्ज मंजूर केलेले, विचाराधीन असलेले प्रस्ताव व नामंजूर केलेले प्रस्ताव यांचा समावेश होतो. सर्व वैयक्तिक, स्वयंसहाय्यता गट/शेतकरी उत्पादक संस्था (FPO)/उत्पादक सहकारी संस्थांचे सभासद यांना **२४ तासाचे/३ दिवसीय** प्रशिक्षण दिले

जाणार आहे.  स्वयंसहाय्यता गट/शेतकरी उत्पादक संस्था (FPO)/उत्पादक सहकारी संस्थां यातील जास्तीत जास्त २ सभासद प्रशिक्षणास पात्र राहतील.

आ) SNA स्तरावरून बीज भांडवलाकरिता मंजूर केलेल्या तसेच MSRLM व NULM या यंत्रणेमार्फत बीज भांडवल प्राप्त झालेल्या स्वयंसहाय्यता गटातील (SHG) लाभार्थी हे ८ **तासाचे/१ दिवसीय** प्रशिक्षणास पात्र राहतील.

इ) योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी असलेले कृषी व संलग्न विभागातील शासकिय अधिकारी व अन्य संसाधन व्यक्ती (जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT - EDP/Food Processing) व जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP).

ई) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य स्तरावरील शासन विभाग जसे की आदिवासी विकास विभाग, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य ग्रामीण/नागरी उपजिविका अभियान, सहकारी विकास महामंडळ, दुग्ध व्यवसाय, मस्य व्यवसाय विभाग, पशु संवर्धन, सामाजिक वनीकरण,  छोट्या शेतकरी कृषी व्यवसाय संघ (SFAC), माविम, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विभाग, राज्य स्तरीय बँक समिती, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग संशोधन संस्था (ATARI), कृषि विज्ञान केंद्र् (KVK), TRIFED इ. मधील संसाधन व्यक्ती व अधिकारी.

## २. प्रशिक्षण संबंधित विविध संस्था

क्षमता बांधणी घटकाचा हेतू नवीन व कार्यरत सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील उद्योजकीय क्षमता बळकट करणे हा असून अन्न हाताळणी, सुरक्षा, स्वच्छता व कारखान्यातील स्वत:ची सुरक्षा या बाबत उद्योजकांचे कौशल्य वृध्दींगत करणे हा आहे. हे उद्दिष्ठ साध्य करण्याकरिता सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील संबंधिताना खालील प्रमाणे राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरावरील प्रशिक्षण संस्था मध्ये प्रशिक्षण देण्यात येईल.

२.१ **राष्ट्रीयस्तरावरील प्रशिक्षण संस्था:** राष्ट्रीय स्तरावरील नॅशनल फूड टेक्नालॉजी एंटरप्रुनरशीप अँड मॅनेजमेंट (NIFTEM) सोनीपत (हरीयाणा) व तंजावर (तामिळनाडू), इंडियन कौन्सील फॅार एग्रिकल्चर रिसर्च (ICAR), नवी दिल्ली / कौन्सिल फॅार सायंटिफिक अँड इंडस्ट्रीयल रिसर्च (CSIR) तसेच राज्य कृषि विद्यापीठे यांची प्रशिक्षणासाठी तांत्रिक मदत घेण्यात येत आहे. या संस्था प्रकल्प उद्योग रचना तयार करण्यासाठी व सक्षम करण्यासाठी मदत करतील.

राष्ट्रीयस्तरावरील प्रशिक्षण संस्थेमार्फत (NIFTEM, Sonipat & NIFTEM, Thanajavur) एकूण २० मास्टर ट्रेनर (Master Trainer) यांना प्रशिक्षण देण्यात  आले आहे. त्यामध्ये अन्न प्रक्रिया (Food Processing) उत्पादनाशी निगडीत (Product Specific) व उद्योजकीय विकास कार्यक्रम (EDP) प्रशिक्षण दिले गेलेले आहे.

२.२ **राज्यस्तरीय तांत्रिक संस्था:** राज्य शासनाने कृषी विज्ञान केंद्र, बारामती या संस्थेची राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) म्हणून निवड केलेली आहे. या संस्थेमार्फत जिल्हा स्तरीय प्रशिक्षकांना उद्योजकीय विकास कार्यक्रम (DLT-EDP) व अन्न प्रक्रिया (DLT - Food

Processing) उत्पादनाशी निगडीत (Product Specific), जिल्हा संसाधन व्यक्तींचे (DRP), जिल्हा नोडल अधिकारी व कृषी संलग्न विभागातील शासकिय अधिकारी, वैयक्तिक /गट लाभार्थी आणि बीज भांडवल प्राप्त लाभार्थी यांना प्रशिक्षण देण्यात येईल.

२.३ **जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था** (DLTI): जिल्हास्तरावर लाभार्थी प्रशिक्षणाकरिता जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्थाची निवड करण्यात आली आहे. या जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था (DLTI) वैयक्तिक/गट लाभार्थी **(२४ तासाचे/३ दिवसीय)** आणि स्वयंसहाय्यता गटातील (SHG) “बीज भांडवल” प्राप्त लाभार्थीचे **(८ तासाचे/१ दिवसीय)** प्रशिक्षण आयोजित करतील.

३. **प्रशिक्षणाचा कार्यपध्दती/प्रकार**

क्षमता बांधणी घटकांतर्गत खालीलप्रमाणे प्रशिक्षण देण्यात येतील.

अ. जिल्हास्तरीय प्रशिक्षकांचे (DLT – EDP & Food Processing) प्रशिक्षण

आ. जिल्हा संसाधन व्यक्तींचे (DRP) प्रशिक्षण

इ. जिल्हास्तरीय समितीने शिफारस (DLC Recommended) केलेले लाभार्थीचे प्रशिक्षण

ई. बीज भांडवल प्राप्त स्वयंसहाय्यता गटातील (Seed Capital SHG Beneficiaries) लाभार्थी प्रशिक्षण

**अ. जिल्हास्तरीय प्रशिक्षकांचे (DLT – EDP & Food Processing) प्रशिक्षण**

राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेमध्ये मास्टर ट्रेनर (Master Trainer) हे जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्थेकडून (DLI) निवड केलेल्या जिल्हा स्तरीय प्रशिक्षकांना उद्योजकीय विकास कार्यक्रम (EDP) व अन्न प्रक्रिया (Food Processing) निगडीत (Product Specific) विषयाबाबत **१६ तासाचे/२ दिवसीय** प्रशिक्षण देतील. प्रत्येक जिल्ह्यामध्ये २ DLT – EDP व २ DLT – product specific निवड करणे आवश्यक आहे. सदर प्रशिक्षकाची निवड जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था व जिल्हा नोडल अधिकारी / जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी समन्वयाने करावी. निवड केलेल्या जिल्हास्तरीय प्रशिक्षकांना EDP व उत्पादनाशी निगडीत (Product Specific) प्रशिक्षकांना राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेमार्फत खालील प्रमाणे प्रशिक्षण देण्यात येईल.

पात्रता:

**उद्योजकीय विकास (EDP) प्रशिक्षक:** RSETI/RUDSETI/NIRD/नियुक्त चे EDP प्रशिक्षक एजन्सी/जिल्हा स्तरावरील प्रशिक्षण संस्था किंवा डिप्लोमा असलेले उमेदवार/ किमान २ वर्षांच्या अनुभवासह व्यवस्थापनातील पदवी, जिल्हा प्रशिक्षक संस्थेने निवडलेले तज्ञ

**अन्न प्रक्रिया प्रशिक्षक** (Food Processing Trainers): अन्न तंत्रज्ञान/अन्न अभियांत्रिकी/अन्न शास्त्र विषयातील किंवा अन्न प्रक्रिया संबंधी कोणत्याही विषयात पदवी/पदविका आणि किमान २ वर्षांचा अनुभव आवश्यक.

**नामांकन** (Nomination)

जिल्हा प्रशिक्षण संस्था (DLTI) निवडलेले तज्ञ (उद्योजकीय विकास व अन्न प्रक्रिया) हे जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT - EDP & Food Processing) म्हणून नामांकित करतील. राज्य नोडल यंत्रणा (SNA)/राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) हे एक उद्योजकीय विकास (EDP) १ + १ प्रशिक्षक (एक राखीव जिल्हास्तरीय प्रशिक्षक) आणि एक अन्न प्रक्रिया प्रशिक्षक (Food Processing Trainers) १ + १ प्रशिक्षक (+एक राखीव जिल्हास्तरीय प्रशिक्षक) नामांकित करतील.

**जिल्हास्तरीय प्रशिक्षक - उद्योजकीय विकास कार्यक्रम (DLT- EDP) प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम:**

जिल्हास्तरीय प्रशिक्षक - उद्योजकीय विकास कार्यक्रम (DLT- EDP) यांना खालील **अभ्यासक्रम वर आधारित १६ तास/२ दिवसाचे प्रशिक्षण** राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) तथा कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथे **देण्यात येईल**

**प्रशिक्षणाचे वेळापत्रक व अभ्यासक्रम -**

| अनु. क्र. | विषय | कालावधी (तास) | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | परिचय<br>(Introduction) | ३.०० | भारतीय खाद्य उद्योगाचा परिचय - स्थिती आणि बाजार आकार समजून घेणे आणि अन्न प्रक्रिया मध्ये पुरवठा साखळी व्यवस्थापित करणे, अन्न प्रक्रिया उद्योगतील संधी, PMFME योजने चे विविध घटक व अनुदान मर्यादा, अन्न प्रक्रिया उद्योग संबंधित योजना /उपक्रम. |
| २ | उद्योजक<br>(Entrepreneurial Risks) | १.०० | उद्योगाची गरज, उद्योजकतेचे मूलभूत कौशल्य, उद्योजकाची वैशिष्ट्ये, उद्योजकतेचे जोखीम, व्यवस्थापकीय कौशल्य, व्यवसाय जोखीम, उद्योजक मन, विकसनशील आत्मविश्वास, मनोवृत्ती निर्माण करणे, व्यवसायातील अपयशांवर मात करणे, यशस्वी व्यवसाय कसे करावे यासाठी मार्गदर्शन, विमा जोखीम ई. |
| ३ | उद्योग/उपक्रम स्थापना<br>(Establishing an Enterprise) | २.०० | अन्न प्रक्रियेमधील नवनविन व्यवसायाच्या संधींचा शोध घेणे व व्यवसाय आराखडा, बाजार सर्वेक्षण, कल्पना प्रमाणीकरण, विविध व्यवसाय योजना, धोरणात्मक भागीदारी किंवा नवीन उपक्रम टाय अप, संस्थेची नोंदणी, यंत्रसामग्री आणि कच्चा माल खरेदी, साहित्य, साठवण, वाहतूक, कर्मचारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रशिक्षण आणि भरती व्यवस्थापन, IT in Business - ERP आणि लेखा प्रणाली. |
| ४ | आर्थिक व्यवस्थापन (Financial Management) | २.०० | आर्थिक व्यवस्थापनाचा परिचय, लेखा पुस्तक ठेवण्याची संकल्पना आणि व्यवस्थापन, उत्पादन व्यवस्थापन: खरेदी तंत्र, Inventory/साहित्य व्यवस्थापन, खर्च नियंत्रण, प्रकल्पाचा आर्थिक आराखडा (बजेटिंग) ई. |
| ५ | बँकिंग आणि निधी (Understanding Banking & Funding) | ३.०० | सामान्य बँक प्रणाली: बँकेचा प्रकार खाती आणि बँक ठेवी, गुंतवणूक आणि निधी पर्याय, बँक कर्ज समजून घेणे: मुदत कर्ज/कार्यरत भांडवल, त्यांचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन, लहान कर्जदारांसाठी विशिष्ट सुविधा: मुद्रा योजना इ. पत हमी/संपार्श्विक मुक्त कर्ज; व्हेंचर कॅपिटल, बँकिंग अनुपालन, क्रेडिट योग्यता आणि कसे ते वाढवण्यासाठी, बँकिंग लोकपाल (बँकिंग लोकपाल). |
| ६ | विपणन आणि ब्रँडिंग (Marketing & Branding) | २.०० | विपणनाची मूलतत्त्वे, विपणन घटक, विपणन तंत्र आणि डिजिटल मार्केटिंग, वितरण चॅनेल, कसे विकायचे - तंत्र, निर्यात संधी, प्रभावी आणि दीर्घकालीन ग्राहक संबंध; डिजिटल मार्केटिंग, लॉजिस्टिक आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन लिंकेज बाजार साखळी, ब्रँडिंग: ब्रँडिंगचे महत्त्व, ब्रँड निर्मिती आणि नोंदणी. |
| ७ | व्यवसाय नोंदणी आणि इतर कायदेशीर अनुपालन (Business Registration and Other Legal Compliances): | २.०० | उद्योग उभारणीकरिता आवश्यक नियामकता, प्रदूषण संबंधित अनुपालन - उद्योग स्थापन करण्यासाठी संमती, इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट (ETP), कामगार कायदे, उद्यम नोंदणी आणि पोर्टल, जीएसटी नोंदणी, आयपीआर-ट्रेडमार्क नोंदणी, निर्यात-आयात परवाना |
| ८ | मूल्यमापन (Assessment) | १.०० | मूल्यमापन (Assessment) हे FICSI मार्फत करण्यात येईल |
| | एकूण | १६.०० | |

आ. जिल्हास्तरीय प्रशिक्षक - अन्न प्रक्रिया प्रशिक्षक (Food Processing Trainers) प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम:

जिल्हास्तरीय प्रशिक्षक - **अन्न प्रक्रिया प्रशिक्षक** (Food Processing Trainers) यांना खालील **अभ्यासक्रम वर आधारित १६ तास/२ दिवसाचे प्रशिक्षण** राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) तथा कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथे **देण्यात येईल.** जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्थेने निवडलेले तज्ञ

**प्रशिक्षणाचे वेळापत्रक व अभ्यासक्रम -**

| अनु. क्र. | विषय | कालावधी (तास) | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | परिचय (Introduction) | ३.०० | भारतीय अन्न प्रक्रिया उद्योगाचा परिचय - स्थिती आणि बाजार आकार समजून घेणे आणि अन्न प्रक्रिया मध्ये पुरवठा साखळी व्यवस्थापित करणे, अन्न प्रक्रिया उद्योगतील संधी, PMFME योजने चे विविध घटक व अनुदान मर्यादा, अन्न प्रक्रिया उद्योग संबंधित योजना /उपक्रम. |
| २ | अन्न प्रक्रियेतील कार्यक्षेत्र: पायाभूत माहिती (Food Domain: Knowledge Base) | ४.०० | अन्न प्रक्रियेची मूलभूत प्रकार (प्राथमिक, दुय्यम आणि तृतीय) (Primary, Secondary and Tertiary Processing) आणि अन्न टिकवणे माहिती (Preservation) * **(स्थानिक व परंपरागत (ODOP) उत्पादने याबाबत खास भर),** अन्न प्रक्रिया उद्योगातील कार्यक्षेत्राचा (Domain) परिचय, सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील उत्पादने व बाजारानुसार संबंधित क्षेत्राची संभाव्यता, सूक्ष्म खाद्य उद्योगाच्या उत्पादनाशी संबंधित विविध तंत्रज्ञान, पॅकेजिंग पैलू व श्रेणी; सूक्ष्म उद्योजकांसाठी PMFME/NIFTEM पोर्टलवर अन्न प्रक्रियेसाठी विशिष्ट माहिती देणे तसेच संबंधित वेबसाइटवर विद्यमान विशिष्ट अन्न पदार्थाबाबत माहिती गोळा करण्यासाठी, विविध डोमेनचे मूल्यवर्धन प्रक्रिया करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करून आणि पॅकेजिंग. |
| ३ | अन्न सुरक्षा & मानके (Food safety & Standards) | ६.०० | अन्न गुणवत्ता आणि सुरक्षितता FSSAI कायदा: महत्त्वाच्या तरतुदी, नियम आणि विनियम, अन्न व्यवसाय ऑपरेटर (FBOs) जबाबदारी आणि कर्तव्ये, अन्न व्यवसाय ऑपरेटर (FBOs) FSSAI कायदा - काय करावे आणि काय करू नये, FSSAI ची अनुसूची ४ - GMP, GHP आणि इतर आवश्यक माहिती, FSSAI |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | परवाना/नोंदणी आणि नूतनीकरण प्रक्रिया, FoSCOS, अन्न पदार्थ बाजारातून परत मागविणे (रिकॉल) आणि ट्रेसेबिलिटी, पॅकेजिंग आणि लेबलिंग आवश्यकता, अन्न प्रक्रिया केलेल्या उत्पादनावर लेबलिंग, पौष्टिक माहिती, HACCP FSMS चे प्रमाणीकरण, FSSAI अन्न सुरक्षित उपक्रम प्रचारासाठी पौष्टिक आणि अन्न सुरक्षा मित्र, प्लांट लेआउट आणि देखभाल: फूड प्लांट डिझाइनची ओळख - प्लांटचे स्थान - स्थान घटक, साइट निवड - सांडपाणी प्रक्रिया ई. आवश्यकतेसह GLP पद्धती चाचणी, विद्यमान NABL प्रयोगशाळा, FSSAI अधिसूचित प्रयोगशाळा, FSSAI आणि आंतरराष्ट्रीय अन्न मानके (CODEX) (उत्पादन & additive) च्या मूलभूत गोष्टींसह भेसळ. |
| ४ | व्यवसाय नोंदणी आणि इतर कायदेशीर अनुपालन (Business Registration and Other Legal Compliances) | २.०० | उद्योग उभारणीकरिता आवश्यक नियमावाली, प्रदूषण संबंधित अनुपालन - उद्योग स्थापन करण्यासाठी संमती, इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट (ETP), कामगार कायदे, उद्यम नोंदणी आणि पोर्टल, जीएसटी नोंदणी, आयपीआर- ट्रेडमार्क नोंदणी, निर्यात-आयात परवाना. |
| ५ | मूल्यमापन (Assessment) | १.०० | मूल्यमापन (Assessment) हे FICSI मार्फत करण्यात येईल |
| | **एकूण** | १६.०० | |

**मूल्यमापन व प्रमाणिकरण** (Assessment & Certifcation): प्रशिक्षण पूर्ण कलेल्या जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT-EDP/Food Processing) चा विहित प्रपत्रातील तपशील राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) तथा कृषी विज्ञान केंद्र,बारामती हे राज्य नोडल यंत्रणे (SNA) कडे सादर करेल. त्यानंतर SNA स्तरावरून योग्यती खातरजमा करून जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT-EDP/Food Processing) च्या मूल्यमापनासाठी NIFTEM व FICSI यांच्याकडे सादर करतील. जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT-EDP/Food Processing) मूल्यमापन (Assessment) हे FICSI मार्फत करण्यात येईल व पास/उत्तीर्ण झालेल्या जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT-EDP/Food Processing) FICSI द्वारे प्रमाणपत्र देण्यात येईल. जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT-EDP/Food Processing)) मूल्यमापन (Assessment) FICSI द्वारे जास्तीत जास्त दोन प्रयत्नांपुरते मर्यादित राहील. जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT-EDP/Food Processing) दोन प्रयत्नांत सफल न झाल्यास FICSI द्वारे घेण्यात येणाऱ्या तिसऱ्या

मूल्यमापनाचा (Assessment) खर्च जिल्हास्तरीय प्रशिक्षकांना (DLT-EDP/Food Processing) स्वतः करावा लागेल.

**जिल्हास्तरीय प्रशिक्षकांचे (DLT-EDP/Food Processing) १६ तास/२ दिवसीय प्रशिक्षणावरील खर्चाचा मापदंड:**

जिल्हास्तरीय प्रशिक्षकांची (DLT-EDP/Food Processing) प्रशिक्षणाची बॅच कमीत कमी १५ - जास्तीत जास्त २० प्रशिक्षणार्थी इतकी राहील. तसेच सदरचे प्रशिक्षण क्लास रूम किंवा Online through Video Conferencing (VC) पद्धतीने घेण्यात येईल.

प्रशिक्षणावरील खर्चाचा मापदंड खालीलप्रमाणे राहील.

**(रक्कम रुपया मध्ये)**

| अनु. क्र. | बाब | किंमत |
|---|---|---|
| १ | मास्टर ट्रेनर (MTs) / तज्ञांसाठी (Expert) मानधन<br>(रु. ३००० प्रति २ तासाचे सत्रास, एकूण ८ सत्रांसाठी)<br>८ सत्र × रु. ३००० = रु. २४,००० | २४,००० |
| २ | अल्पोपहार आणि दुपारचे जेवण<br>(रु. १०० प्रति व्यक्ती प्रति दिवस) | ५,००० |
| ३ | संस्थात्मक (Institutitional) शुल्क<br>(रु. ३०००/दिवस) | ६,००० |
| ४ | संकीर्ण खर्च / विविध शुल्कामध्ये (Miscellaneous), साहित्य छपाई व स्टेशनरी खर्चाचा समावेश आहे.<br>(रु. ३०००/दिवस) | ६,००० |
| ५ | प्रशिक्षणार्थीचा TA/DA<br>(रु. ५००/दिवस/व्यक्ती) | १५,००० |
| ६ | मूल्यमापन (Assessment) खर्च<br>(रु. ४५०/व्यक्ती) | ६,७५० |
| **प्रशिक्षणाची एकूण किंमत (१५ प्रशिक्षणार्थींच्या बॅचसाठी)** | | **६२,७५०** |
| **प्रति प्रशिक्षणार्थी खर्च** | | **४,१८३** |

- VC द्वारे ऑनलाइन प्रशिक्षणाच्या बाबतीत वरीलप्रमाणे अल्पोपहार आणि दुपारचे जेवण खर्च लागू होणार नाही
- विविध संकीर्ण (Miscellaneous) खर्च वास्तविकतेनुसार (Actuals) कमाल रु. ३००० प्रति बॅच प्रति दिवस इतका असेल.
- मास्टर ट्रेनर (MTs)/तज्ञांसाठी TA/DA (इतर जिल्ह्यातून प्रवास करत असल्यास):

    अ. रुपये १५०० पर्यंत प्रवास खर्च (जाणे - येणे)

आ. प्रति दिन भत्ता: टियर - I शहरांसाठी रु २०००, टियर - II शहरांसाठी रु १५०० आणि टियर - III शहरांसाठी रु. १२००

- वरील तक्त्यातील अनु. क्र. १, २, ३ व ४ मधील रकमा ह्या १५ प्रशिक्षणार्थीसाठी प्रति बॅचसाठी Fixed राहतील. तसेच उपरोक्त तक्त्यातील अनु. क्र. ५ व ६ मधील रकमा प्रशिक्षणार्थ्यांच्या उपस्थित संख्येनुसार बदलतील.
- जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT-EDP/Food Processing) हे FICSI द्वारे झालेल्या मूल्यमापनामध्ये (Assessment) पास/उत्तीर्ण झाल्यास TA/DA ला पात्र राहतील.

**DLT प्रशिक्षणाची पोर्टलवरील कार्यवाही :**

DLT बॅच तयार करणे, DLT बॅच मध्ये समाविष्ट (Add) करणे, DLT नामांकन करणे, अनुदान मागणी व वितरण, प्रशिक्षण आयोजन, DLT उपस्थिती अहवाल (Status Update) करणे, प्रशिक्षणाचे FICSI द्वारे मूल्यमापन, प्रमाणपत्र डाऊनलोड व वितरण, प्रशिक्षणाचा खर्च, प्रशिक्षणाचा अहवाल, विविध प्रपत्र अपलोड (Annexure - III, IV, V & VI) करणे ई. बाबीची कालमर्यादा व जबाबदारी याचा तपशील सोबत प्रपत्रात (Annexure - I) जोडलेला असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**आ. जिल्हा संसाधन व्यक्तींचे (DRP) प्रशिक्षण:**

जिल्हास्तरीय समितीने निवड केलेल्या जिल्हा संसाधन व्यक्तींना (DRP) राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) तथा कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांचे मार्फत **१६ तासांचे/२ दिवसीय ऑनलाईन प्रशिक्षण** देण्यात येईल. प्रशिक्षणासाठी १५ - ५० प्रशिक्षणार्थी प्रती बॅच एवढी असेल.

**जिल्हा संसाधन व्यक्तींची (DRP) पात्रता:**

जिल्हा संसाधन व्यक्तीं हा सेवानिवृत्त सरकारी/बँकेचा अधिकारी, विमा एजंट, बँक मित्र, सल्लागार कंपन्या (Cosultancy Firm)/सनदी लेखापाल (Chartered Accountant), व्यावसायिक व्यक्ती इ.

**जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) शैक्षणिक अर्हताः**

१. विद्यापीठ/मान्यताप्राप्त संस्था यांचेकडील अन्न तंत्रज्ञान/अन्न अभियांत्रिकी मधील पदविका पदवी/पदव्युतर पदवी इ. किंवा
२. कृषि व कृषि संबंधित पदव्युतर/पदवी इ. किंवा
३. इतर कोणत्याही शाखेतून पदवी/पदव्युतर पदवी इ. किंवा
४. एखादी अनुभवी सेवा पुरवठादार संस्थाही DRP म्हणून कार्य करू शकेल.
५. संगणकीय ज्ञान असणे आवश्यक राहील.

मान्यता प्राप्त जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) हा कोणत्याही शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचारी नसावी. कोणत्याही प्रकारचे मानधन घेणारा नसावा

प्रशिक्षण वेळापत्रक व अभ्यासक्रम:

जिल्हा संसाधन व्यक्तींना खालील अभ्यासक्रमानुसार MT- अन्न प्रक्रिया / उद्योजकीय विकास कार्यक्रम प्रशिक्षक/तज्ञ (Expert) यांचेद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येईल.

| अनु. क्र. | विषय | कालावधी (तास) | अभ्यासक्रम | प्रशिक्षक |
|---|---|---|---|---|
| १ | योजना संबंधित तपशील (Scheme Related Details) | २.५० | योजनेचे विविध घटक, योजना कृतीसंगम व PMFME पोर्टल/MIS चे कार्यन्वयन. | MT- EDP/Food Processing*Arranged by NIFTEM/SNA/SLTI) |
| २ | पत संबंधित तपशील (Credit Related Details) | ३.०० | सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणे, प्रस्तावाचे मूल्यांकन, बँकिंग पैलू सामान्य बँकिंग प्रकार, बँक खाती आणि बँक ठेव, गुंतवणूक तंत्र. | MT- EDP/ Banking Experts (Arranged by NIFTEM or SNA/SLTI) |
| ३ | नोंदणी आणि परवाना (Registration & Licensing) | २.५० | अन्न सुरक्षा आणि मानक कायदा व नियमावली, अन्न व्यवसाय ऑपरेटर (Food Business Operator) भूमिका आणि जबाबदाऱ्या, FSSAI - नोंदणी आणि परवाना देणे. | MT- Food Processing /FSSAI Trainer/Experts (FSSAI Trainer to be arranged by NIFTEM) |
| ४ | अन्न सुरक्षा आणि मानके नियमावली (Food Safety & Standards Regulations) | २.५० | पॅकेजिंग आणि लेबलिंग नियमन, प्लांट लेआउट, डिझाइन आणि देखभाल, चांगल्या उत्पादन पद्धती (GMP) आणि चांगल्या स्वच्छता पद्धती (GHP) यासह अन्न पदार्थ उत्पादना करिता पाणी विश्लेषण. | MT- Food Processing (Arranged by SNA/SLTI) |
| ५ | व्यवसाय नोंदणी आणि इतर कायदेशीर अनुपालन (Business Registration and Other Legal Compliances) | २.०० | जीएसटी नोंदणी, एमएसएमई नोंदणी (उद्योग आधार/उद्यम नोंदणी), पॅन नोंदणी आणि इतर आवश्यक संबंधित नियामक स्थापना, उत्पादन युनिट, अग्नि सुरक्षा परवाना, प्रदूषण नियंत्रण, व्यापार परवाना, | MT- EDP (Arranged by SNA/SLTI) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | महानगरपालिका/महामंडळ परवाना, आयात व निर्यात संकेतांक (IEC) परवाना ई. | |
| ६ | विपणन आणि ब्रँडिंग (Marketing & Branding) | २.५० | विपणन तंत्र आणि डिजिटल मार्केटिंग, वितरण मार्ग, निर्यात संधी, प्रभावी आणि दीर्घकालीन साखळी व्यवस्थापन, बाजाराशी संबंध साखळी, ब्रँडिंगचे महत्त्व ब्रँड निर्मिती आणि नोंदणी. | MT- EDP (Arranged by SNA/SLTI) |
| ७ | मूल्यमापन व प्रमाणिकरण (Assessment & Certifcation) | १.०० | मूल्यमापन (Assessment) हे FICSI मार्फत करण्यात येईल | FICSI |
| | एकूण | १६.०० | | |

**मूल्यमापन व प्रमाणिकरण** (Assessment & Certifcation)**:** प्रशिक्षण पूर्ण कलेल्या DRP चा विहित प्रपत्रातील तपशील, राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) तथा कृषी विज्ञान केंद्र,बारामती राज्य नोडल यंत्रणा (SNA) कडे सादर करेल. त्यानंतर SNA स्तरावरून योग्यती खातरजमा करून DRP च्या मूल्यमापनासाठी NIFTEM व FICSI यांच्याकडे सादर करतील. जिल्हा संसाधन व्यक्तींचे मूल्यमापन (Assessment) हे FICSI मार्फत करण्यात येईल व पास/उत्तीर्ण झालेल्या जिल्हा संसाधन व्यक्तींना FICSI द्वारे प्रमाणपत्र देण्यात येईल. जिल्हा संसाधन व्यक्तींचे (DRPs) मूल्यमापन (Assessment) FICSI द्वारे जास्तीत जास्त दोन प्रयत्नांपुरते मर्यादित राहील. जिल्हा संसाधन व्यक्तीं दोन प्रयत्नांत सफल न झाल्यास FICSI द्वारे घेण्यात येणाऱ्या तिसऱ्या मूल्यमापनाचा (Assessment) खर्च जिल्हा संसाधन व्यक्तींना स्वतः करावा लागेल.

**जिल्हा संसाधन व्यक्तींच्या (DRP) १६ तास/२ दिवसीय प्रशिक्षणावरील खर्चाचा मापदंड:**

किमान बॅच साईज हि १५ जिल्हा संसाधन व्यक्तींकरिता राहील व प्रशिक्षणावरील खर्चाचा मापदंड खालीलप्रमाणे राहील.

**(रक्कम रुपया मध्ये)**

| अनु. क्र. | बाब | किंमत |
|---|---|---|
| १ | मास्टर ट्रेनर (MTs) / तज्ञांसाठी (Expert) मानधन<br>(रु. ३००० प्रति २ तासाचे सत्रास, एकूण ८ सत्रांसाठी)<br>८ सत्र × रु. ३००० = रु. २४,००० | २४,००० |
| २ | संस्थात्मक (Institutitional) शुल्क<br>(रु. ३०००/दिवस) | ६,००० |
| ३ | संकीर्ण खर्च / विविध शुल्कामध्ये (Miscellaneous) साहित्य छपाई व स्टेशनरी खर्चाचा समावेश आहे.<br>(रु. ३०००/दिवस) | ६,००० |
| ४ | प्रशिक्षणार्थीचा TA/DA<br>(रु. ५००/दिवस/व्यक्ती) | १५,००० |
| ५ | मूल्यमापन (Assessment) खर्च (रु. ४५०/व्यक्ती) | ६,७५० |
| **प्रशिक्षणाची एकूण किंमत (५० प्रशिक्षणार्थींच्या बॅचसाठी)** | | **५७,७५०** |
| **प्रति प्रशिक्षणार्थी खर्च** | | **३,८५०** |

- बॅच आकार (किमान-कमाल): १५-५०
- विविध संकीर्ण (Miscellaneous) खर्च वास्तविकतेनुसार (Actuals) कमाल रु. ३००० प्रति बॅच प्रति दिवस इतका असेल.
- वरील तक्त्यातील अनु. क्र. १, २ व ३ मधील रकमा ह्या १५-५० प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रति बॅचसाठी Fixed राहतील. तसेच अनु. क्र. ४ व ५ मधील रकमा प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थित संख्येनुसार बदलतील.
- जिल्हा संसाधन व्यक्तीं (DRP) हे FICSI द्वारे झालेल्या मूल्यमापनामध्ये (Assessment) पास/उत्तीर्ण झाल्यास TA/DA ला पात्र राहतील.

अधिक तपशीला करिता DRP Manual चा वापर करावा.

**DRP प्रशिक्षणाची पोर्टलवरील कार्यवाही :**

DRP बॅच तयार करणे, DRP बॅच मध्ये समाविष्ट (Add) करणे, DRP नामांकन करणे, अनुदान मागणी व वितरण, प्रशिक्षण आयोजन, DRP उपस्थिती अहवाल, Status Update करणे, प्रशिक्षणाचे FICSI द्वारे मूल्यमापन, प्रमाणपत्र डाऊनलोड व वितरण, प्रशिक्षणाचा खर्च, प्रशिक्षणाचा अहवाल, विविध प्रपत्र (Annexure - III, IV, V & VI) अपलोड करणे ई. बाबीची कालमर्यादा व जबाबदारी याचा तपशील सोबत प्रपत्रात (Annexure - I) जोडलेला असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**इ. जिल्हास्तरीय समितीने शिफारस केलेले लाभार्थींचे प्रशिक्षण**

जिल्हास्तरीय प्रशिक्षकांकडून जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था/राज्यस्तरीय तांत्रिक संस्था मध्ये लाभार्थींना (वैयक्तिक/गट) **२४ तासांचे/३ दिवसीय** प्रशिक्षण देण्यात येईल.

**लाभार्थी पात्रता**

जिल्हास्तरीय समिती ने शिफारस केलेल्या अर्जदारांना खालील प्राधान्य क्रमानुसार प्रशिक्षण देण्यात येईल.

अ. ज्या अर्जदारांचा (वैयक्तिक/गट) योजने अंतर्गत कर्ज मंजूर झालेले आहे असे लाभार्थी

आ. जिल्हास्तरीय समिती ने शिफारस केलेले व बँकेकडील विचाराधीन असलेले प्रस्तावातील (वैयक्तिक/गट) लाभार्थी.

इ. ज्या अर्जदाराचे प्रकल्प प्रस्ताव बँकेने नामंजूर केलेले आहे असे (वैयक्तिक/गट) लाभार्थी.

प्रशिक्षणासाठी एका बॅच मध्ये किमान २० व जास्तीत जास्त ३० लाभार्थी राहतील. गट लाभार्थींचे बाबतीत गटातील दोनच सभासदांना प्रशिक्षणामध्ये सहभाग घेता येईल.

**प्रशिक्षणाचे वेळापत्रक व अभ्यासक्रम –**

| अनु. क्र. | विषय | कालावधी (तास) | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | परिचय (Introduction) | २.०० | भारतीय खाद्य उद्योगाचा परिचय - स्थिती आणि बाजार आकार समजून घेणे आणि अन्न प्रक्रिया मध्ये पुरवठा साखळी व्यवस्थापित करणे, अन्न प्रक्रिया उद्योगतील संधी, PMFME योजने चे विविध घटक व अनुदान मर्यादा, अन्न प्रक्रिया उद्योग संबंधित योजना /उपक्रम. |
| २ | उद्योग/उपक्रम स्थापना (Establishing an Enterprise) | ३.०० | अन्न प्रक्रियेमधील नवनविन व्यवसायाच्या संधींचा शोध घेणे व व्यवसाय आराखडा, बाजार सर्वेक्षण, कल्पना प्रमाणीकरण, विविध व्यवसाय योजना, धोरणात्मक भागीदारी किंवा नवीन उपक्रम टाय अप, संस्थेची नोंदणी, यंत्रसामग्री आणि कच्चा माल ४खरेदी, साहित्य, साठवण, वाहतूक, कर्मचारी प्रशिक्षण आणि भरती व्यवस्थापन, IT in Business - ERP आणि लेखा प्रणाली. |
| ३ | उद्योजक (Entrepreneurial Risks) | २.०० | उद्योगाची गरज, उद्योजकतेचे मूलभूत कौशल्य, उद्योजकाची वैशिष्ट्ये, उद्योजकतेचे जोखीम, व्यवस्थापकीय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कौशल्य, व्यवसाय जोखीम, उद्योजक मन, विकसनशील आत्मविश्वास, मनोवृत्ती निर्माण करणे, व्यवसायातील अपयशांवर मात करणे, यशस्वी व्यवसाय कसे करावे यासाठी मार्गदर्शन, विमा जोखीम ई. |
| ४ | आर्थिक व्यवस्थापन (Financial Management) | २.०० | आर्थिक व्यवस्थापनाचा परिचय, लेखा पुस्तक ठेवण्याची संकल्पना आणि व्यवस्थापन, उत्पादन व्यवस्थापन: खरेदी तंत्र, Inventory/साहित्य व्यवस्थापन, खर्च नियंत्रण, प्रकल्पाचा आर्थिक आराखडा (बजेटिंग) ई. |
| ५ | बँकिंग आणि निधी (Understanding Banking & Funding) | २.०० | सामान्य बँक प्रणाली: बँकेचा प्रकार खाती आणि बँक ठेवी, गुंतवणूक आणि निधी पर्याय, बँक कर्ज समजून घेणे: मुदत कर्ज/कार्यरत भांडवल, त्यांचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन, लहान कर्जदारांसाठी विशिष्ट सुविधा: मुद्रा योजना इ. पत हमी/संपार्श्विक मुक्त कर्ज; व्हेंचर कॅपिटल, बँकिंग अनुपालन, क्रेडिट योग्यता आणि कसे ते वाढवण्यासाठी, बँकिंग लोकपाल (बँकिंग लोकपाल). |
| ६ | विपणन आणि ब्रँडिंग (Marketing & branding) | ३.३० | विपणनाची मूलतत्त्वे, विपणन घटक, विपणन तंत्र आणि डिजिटल मार्केटिंग, वितरण चॅनेल, कसे विकायचे - तंत्र, निर्यात संधी, प्रभावी आणि दीर्घकालीन ग्राहक संबंध; डिजिटल मार्केटिंग, लॉजिस्टिक आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन लिंकेज बाजार साखळी, ब्रँडिंग: ब्रँडिंगचे महत्त्व, ब्रँड निर्मिती आणि नोंदणी. |
| ७ | अन्न प्रक्रियेतील कार्यक्षेत्र: पायाभूत माहिती (Food Domain: Knowledge Base) | ३.०० | अन्न प्रक्रियेची मूलभूत प्रकार (प्राथमिक, दुय्यम आणि तृतीय) (Primary, Secondary and Tertiary) आणि अन्न टिकवणे माहिती (Preservation) )* **(स्थानिक व परंपरागत (ODOP) उत्पादने याबाबत खास भर),** अन्न **प्रक्रिया** उद्योगातील वेगवेगळ्या कार्यक्षेत्राचा (Domain) परिचय, सूक्ष्म अन्न प्रक्रिया |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | उद्योगातील उत्पादने व बाजारानुसार संबंधित क्षेत्राची संभाव्यता, सूक्ष्म खाद्य उद्योगाच्या उत्पादनाशी संबंधित विविध तंत्रज्ञान, पॅकेजिंग पैलू व श्रेणी; सूक्ष्म उद्योजकांसाठी PMFME/NIFTEM पोर्टलवर अन्न प्रक्रियेसाठी विशिष्ट माहिती देणे तसेच संबंधित वेबसाइटवर विद्यमान विशिष्ट अन्न पदार्थाबाबत माहिती गोळा करण्यासाठी, विविध डोमेनचे मूल्यवर्धन प्रक्रिया करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करून आणि पॅकेजिंग. |
| ८ | अन्न सुरक्षा & मानके (Food safety & Standards) | ६.०० | अन्न गुणवत्ता आणि सुरक्षितता FSSAI कायदा: महत्त्वाच्या तरतुदी, नियम आणि विनियम, अन्न व्यवसाय ऑपरेटर (FBOs) जबाबदारी आणि कर्तव्ये, अन्न व्यवसाय ऑपरेटर (FBOs) FSSAI कायदा - काय करावे आणि काय करू नये, FSSAI ची अनुसूची ४ - GMP, GHP आणि इतर आवश्यक माहिती, FSSAI परवाना/नोंदणी आणि नूतनीकरण प्रक्रिया, FoSCOS, अन्न पदार्थ बाजारातून परत मागविणे (रिकॉल) आणि ट्रेसेबिलिटी, पॅकेजिंग आणि लेबलिंग आवश्यकता, अन्न प्रक्रिया केलेल्या उत्पादनावर लेबलिंग, पौष्टिक माहिती, HACCP FSMS चे प्रमाणीकरण, FSSAI अन्न सुरक्षित उपक्रम प्रचारासाठी पौष्टिक आणि अन्न सुरक्षा मित्र, प्लांट लेआउट आणि देखभाल: फूड प्लांट डिझाइनची ओळख - प्लांटचे स्थान - स्थान घटक, साइट निवड - सांडपाणी प्रक्रिया ई. आवश्यकतेसह GLP पद्धती चाचणी, विद्यमान NABL प्रयोगशाळा, FSSAI अधिसूचित प्रयोगशाळा, FSSAI आणि आंतरराष्ट्रीय अन्न मानके (CODEX) (उत्पादन & additive) च्या मूलभूत गोष्टींसह भेसळ. |
| ९ | व्यवसाय नोंदणी आणि इतर कायदेशीर अनुपालन | २.३० | उद्योग उभारणीकरिता आवश्यक नियमावाली, प्रदूषण संबंधित अनुपालन - |

| | | | |
|---|---|---|---|
| | (Business Registration and Other Legal Compliances) | | उद्योग स्थापन करण्यासाठी संमती, इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट (ETP), कामगार कायदे, उद्यम नोंदणी आणि पोर्टल, जीएसटी नोंदणी, आयपीआर- ट्रेडमार्क नोंदणी, उत्पन्न कर/पॅन, निर्यात-आयात परवाना. |
| १० | मूल्यमापन (Assessment) | ०.५० | मूल्यमापन आणि लाभार्थी अभिप्राय (Internal Assessment and Beneficiary Feedback) |
| | **एकूण** | **२४.००** | |

**लाभार्थी प्रशिक्षण मूल्यमापन व प्रमाणिकरण**

- लाभार्थी प्रशिक्षणाचे मूल्यमापन (Assesment) हे समन्वयक, राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI)/संबंधित जिल्हा नोडल अधिकारी (DNO) - जिल्हा संसाधन व्यक्ती यांच्या मदतीने प्रशिक्षणाच्या प्रथम व शेवटच्या दिवशी प्रशिक्षणास भेट देऊन जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्थेच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत करतील.
- जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्थेकडून लाभार्थी उपस्थितीचा अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक संस्थाकडे (SLTI) प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी दुपारी १२ वाजेपर्यंत जमा करण्यात येईल.
- राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) उपस्थिती अहवाला नुसार वेब-आधारित माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) पोर्टलवर Present/Absent चे Status Update प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ४ वाजेपर्यंत करतील.
- Status Update झाल्यानंतर जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था लाभार्थीचे प्रमाणपत्र (Certificates) डाउनलोड व प्रिंट करून संबंधित लाभार्थीस प्रशिक्षणाच्या समारोपात वितरीत करतील.
- राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथील **लाभार्थी प्रशिक्षणाचे मूल्यमापन हे संबधित उप विभागीय कृषी अधिकारी, बारामती तथा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी** - जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) यांच्या मदतीने प्रशिक्षणाच्या प्रथम व शेवटच्या दिवशी प्रशिक्षणास भेट देऊन प्रशिक्षण समन्वयक (Training Coordinator) राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) यांच्या उपस्थितीत करतील.

लाभार्थीचे प्रशिक्षणाचे मापदंड

(रक्कम रुपया मध्ये)

| अनु. क्र. | बाब | प्रती लाभार्थी खर्च | किमान २० लाभार्थींच्या बॅचसाठी खर्च | जास्तीत जास्त ३० लाभार्थींच्या बॅचसाठी खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | DLT/तज्ञांसाठी (Expert) मानधन<br>(रु. ११६६ प्रति २ तासाचे सत्रास, एकूण १२ सत्रांसाठी)<br>१२ सत्र × रु. ११६६ = रु. १३,९९२<br>रु. १३,९९२ /२० लाभार्थी = ६९९.६० | ७०० | १४००० | १४००० |
| २ | पायाभूत सुविधा<br>(Infrastructure facility) | ७०० | १४००० | १४००० |
| ३ | जमवा जमव खर्च<br>(Mobilization Expenses) | २०० | ४००० | ६००० |
| ४ | अभ्यास साहित्य, माहिती पुस्तिका व इतर खर्च जसे नोट पॅड व पेन ई. | २५० | ३००० | ४५०० |
| ५ | पिण्याचे पाणी/चहा/अल्पोपहार/जेवण ई. | ४७४ | ९४८० | १४२२० |
| ६ | लाभार्थी देय रक्कम<br>(Beneficiary Pay Out) | ५०० | १०००० | १५००० |
| **एकूण खर्च** | | **२७२४** | **५४४८०** | **६७७२०** |

- लाभार्थींचा TA/DA खर्च रु. २५० प्रती दिवस देय राहील.
- MT/DLT/तज्ञांसाठी TA/DA (इतर जिल्ह्यातून प्रवास करत असल्यास):
  - ई. रुपये १५०० पर्यंत प्रवास खर्च (जाणे - येणे)
  - उ. प्रति दिन भत्ता: टियर - I शहरांसाठी रु २०००, टियर - II शहरांसाठी रु १५०० आणि टियर - III शहरांसाठी रु. १२००
- रु. ५०० प्रती लाभार्थी देय रक्कम (Pay Out) हा ३ दिवसा साठी देणे बंधनकारक राहील.
- लाभार्थी देय रक्कम (Pay Out) PFMS प्रणाली द्वारे देणे बंधनकारक राहील.
- वरील तक्त्यातील अनु. क्र. १ व २ मधील रकमा ह्या २० प्रशिक्षणार्थीसाठी प्रति बॅचसाठी Fixed राहतील. तसेच अनु. क्र. ३,४,५ व ६ मधील रकमा प्रशिक्षणार्थ्यांच्या संख्येनुसार बदलतील.
- लाभार्थीना प्रशिक्षण हे एकदाच घेता येईल. प्रशिक्षणाकरिता लाभार्थ्याची पुनरावृत्ती होणार नाही ह्याची संबंधित प्रशिक्षण संस्था व नोडल अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

**प्रशिक्षण संस्थाद्वारे प्रशिक्षण पोर्टलवरील (MIS) कार्यवाही (niftem-t.ac.in):**

**लाभार्थी** बॅच तयार करणे, लाभार्थी बॅच मध्ये समाविष्ट (Add) करणे, अनुदान मागणी व वितरण, प्रशिक्षण आयोजन, प्रशिक्षणाचे मूल्यमापन, लाभार्थी उपस्थिती अहवाल, Status Update करणे, प्रमाणपत्र डाऊनलोड व वितरण, प्रशिक्षणाचा खर्च, प्रशिक्षणाचा अहवाल, विविध प्रपत्र (Annexure – III, IV, V & VI) अपलोड करणे ई.

वरील बाबींची कालमर्यादा व जबाबदारी याचा तपशील सोबत प्रपत्रात (Annexure – II) जोडलेला आहे.

**ई. बीज भांडवल प्राप्त स्वयंसहाय्यता गटातील लाभार्थी प्रशिक्षण.**

- SNA स्तरावरून बीज भांडवलाकरिता मंजूर केलेल्या स्वयंसहाय्यता गटातील (SHG) सदस्य व MSRLM व NULM यांचेमार्फत बीज भांडवल प्राप्त झालेल्या स्वयंसहाय्यता गटातील सदस्य/लाभार्थी **८ तासाचे/१ दिवसीय** प्रशिक्षणास पात्र राहतील.
- जिल्हास्तरीय प्रशिक्षकांकडून जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था (DLTI)/राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) स्वयंसहाय्यता गटातील (SHG) "बीज भांडवल" (Seed Capital) प्राप्त सदस्य/लाभार्थी यांना प्रशिक्षण देण्यात येईल.
- प्रशिक्षणासाठी एका बॅच मध्ये किमान २० व जास्तीत जास्त ३० लाभार्थी राहतील.
- MSRLM व NULM यांचेमार्फत बीज भांडवलाचे अर्ज करण्यासाठी सहाय्य करण्यात आलेल्या **समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) / जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) / संबंधित कर्मचारी मार्फत लाभार्थी व संबंधित जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था (DLTI) / राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI)** यांच्याशी समन्वय साधून प्रशिक्षणाचे नियोजन करतील. तसेच सर्व लाभार्थी प्रशिक्षणास उपस्थित राहतील याबाबत खात्री करणे ई. जबाबदारी हि संबंधित समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) करतील.
- बीज भांडवल प्राप्त लाभार्थ्यांची यादी MSRLM व NULM यंत्रणेचे राज्य/जिल्हा अभियान व्यवस्थापनातील अधिकारी (State/District Mission Manager) यांनी संबंधित जिल्हाच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे देण्यात यावी.
- जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी सदरची यादी संबंधित जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था (DLTI)/राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) यांच्याकडे प्रशिक्षण आयोजनाकरिता देतील.

प्रशिक्षण वेळापत्रक व अभ्यासक्रम:

| अनु. क्र. | विषय | कालावधी (तास) | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | परिचय (Introduction) | ०.५० | भारतीय खाद्य उद्योगाचा परिचय - स्थिती आणि बाजार आकार समजून घेणे आणि अन्न प्रक्रिया मध्ये पुरवठा साखळी व्यवस्थापित करणे, अन्न प्रक्रिया उद्योगतील संधी, PMFME योजने चे विविध घटक व अनुदान मर्यादा, अन्न प्रक्रिया उद्योग संबंधित योजना /उपक्रम. |
| २ | अन्न प्रक्रियेतील कार्यक्षेत्र: पायाभूत माहिती (Food Domain: Knowledge Base) | २.०० | अन्न प्रक्रियेची मूलभूत प्रकार (प्राथमिक, दुय्यम आणि तृतीय) (Primary, Secondary and Tertiary) आणि अन्न टिकवणे माहिती (Preservation) )* **(स्थानिक व परंपरागत (ODOP) उत्पादने याबाबत खास भर)**, अन्न प्रक्रिया उद्योगातील विविध कार्यक्षेत्राचा (Domain) परिचय, सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील उत्पादने व बाजारानुसार संबंधित क्षेत्राची संभाव्यता, सूक्ष्म खाद्य उद्योगाच्या उत्पादनाशी संबंधित विविध तंत्रज्ञान, पॅकेजिंग पैलू व श्रेणी; सूक्ष्म उद्योजकांसाठी PMFME/NIFTEM पोर्टलवर अन्न प्रक्रियेसाठी विशिष्ट माहिती देणे तसेच संबंधित वेबसाइटवर विद्यमान विशिष्ट अन्न पदार्थाबाबत माहिती गोळा करण्यासाठी, विविध डोमेनचे मूल्यवर्धन प्रक्रिया करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करून आणि पॅकेजिंग. |
| ३ | प्रात्यक्षिक (लक्ष्य नुसार प्रेक्षक) (Demonstration (As per target audience)) | २.०० | घरगुती उपकरणे वापरणे |
| ४ | उद्योग/उपक्रम स्थापना (Establishing an Enterprise) | ०.५० | यंत्रसामग्री आणि कच्च माल खरेदी, साहित्य, साठवण, वाहतूक, कर्मचारी भरती आणि प्रशिक्षण, इन्व्हेंटरी (Inventory) व्यवस्थापन: दैनंदिन व्यवहारांची नोंद ठेवणे, खरेदी नोंदवही, विक्री रजिस्टर ठेवा इ. कार्यरत भांडवल व्यवस्थापन (Working Capital Management): कार्यरत भांडवल निर्णय इ. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | अन्न सुरक्षा & मानके, उद्यमी नोंदणी, जीएसटी नोंदणी आणि त्याचे उत्पन्न (Food safety & Standards, Udyami Registration, GST registrations and its returns) | १.०० | FSSAI नोंदणी आणि परवाना, अनुसूची IV - FSSAI (GMP, जीएचपी, जीएलपी पद्धतींचा अन्न उत्पादनांच्या चाचणीसाठी आवश्यकता), उद्यमी नोंदणी, जीएसटी नोंदणी. |
| ६ | पॅकेजिंग तंत्रज्ञान & FSSAI पॅकेजिंग आणि लेबलिंग (Packaging Technology & FSSAI packaging and labelling requirement) | १.०० | पॅकेजिंगचे आवश्यकता, पॅकेजिंगचे मटेरीअल प्रकार, पॅकेजिंग मशीन, पॅकेजिंगचे प्रकार (Primary, Secondary and Tertiary) पॅकेजिंग मटेरीअल निवड, FSSAI लेबलिंग मानदंड. |
| ७ | विपणन, ब्रँडिंग, विक्री आणि वितरण (Marketing, branding, sales & distribution) | १.०० | विपणन आणि ब्रँडिंग तंत्र: मूलभूत गोष्टी, ब्रँडिंगचे महत्त्व, निर्धारण किंमत, किंमत निश्चित करण्याच्या पद्धती, उत्पादन प्लेसमेंट, विक्री आणि वितरण - बाजार व मूल्य साखळी (Market & Value Chain) |
| | **एकूण** | ८.०० | |

**लाभार्थी प्रशिक्षण मूल्यमापन व प्रमाणिकरण**

- जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था (DLTI)/राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) आयोजीत प्रशिक्षणास MSRLM व NULM यंत्रणेचे राज्य/जिल्हा अभियान व्यवस्थापनातील (State/District Mission Manager) १ अधिकारी सदर प्रशिक्षणास उपस्थित राहून प्रशिक्षणातील लाभार्थी उपस्थिती बाबत खात्री करतील.
- लाभार्थी प्रशिक्षणाचे मूल्यमापन (Assesment) हे समन्वयक, राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI)/संबंधित जिल्हा नोडल अधिकारी (DNO) - प्रशिक्षणास भेट देऊन जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्थेच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत करतील.
- जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्थेकडून लाभार्थी उपस्थितीचा अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक संस्थाकडे (SLTI) प्रशिक्षणाच्या दिवशी दुपारी १२ वाजेपर्यंत जमा करण्यात येईल. राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) उपस्थिती अहवाला नुसार वेब-आधारित माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) पोर्टलवर Present/Absent चे Status Update प्रशिक्षणाच्या दिवशी सायंकाळी ४ वाजेपर्यंत करतील.
- Status Update झाल्यानंतर जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था लाभार्थीचे प्रमाणपत्र (Certificates) डाउनलोड व प्रिंट करून संबंधित लाभार्थीस प्रशिक्षणाच्या समारोपात वितरीत करतील.
- राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथील **लाभार्थी प्रशिक्षणाचे मूल्यमापन हे संबधित उप विभागीय कृषी अधिकारी, बारामती तथा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी** - जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) यांच्या मदतीने प्रशिक्षणाच्या दिवशी प्रशिक्षणास

भेट देऊन प्रशिक्षण समन्वयक (Training Coordinator) राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) यांच्या उपस्थितीत करतील.

**प्रशिक्षण संस्थाद्वारे प्रशिक्षण पोर्टलवरील (MIS) कार्यवाही (niftem-t.ac.in):**

लाभार्थी बॅच तयार करणे, लाभार्थी बॅच मध्ये समाविष्ट (Add) करणे, अनुदान मागणी व वितरण, प्रशिक्षण आयोजन, प्रशिक्षणाचे मूल्यमापन, लाभार्थी उपस्थिती अहवाल, Status Update करणे, प्रमाणपत्र डाऊनलोड व वितरण, प्रशिक्षणाचा खर्च, प्रशिक्षणाचा अहवाल, विविध प्रपत्र (Annexure - III, IV, V & VI) अपलोड करणे ई.

वरील बाबींची कालमर्यादा व जबाबदारी याचा तपशील सोबत प्रपत्रात (Annexure - II) जोडलेला आहे.

**बीज भांडवल प्राप्त लाभार्थी प्रशिक्षणाचे मापदंड:**

**(रक्कम रुपया मध्ये)**

| अनु. क्र. | बाब | प्रती लाभार्थी खर्च | किमान २० लाभार्थींच्या बॅचसाठी खर्च | जास्तीत जास्त ३० लाभार्थींच्या बॅचसाठी खर्च |
|---|---|---|---|---|
| Fixed Cost | | | | |
| १ | DLT/तज्ज्ञांसाठी (Expert) मानधन<br>(रु. ११६६ प्रति २ तासाचे सत्रास, एकूण ४ सत्रांसाठी)<br>४ सत्र × रु. ११६६ = रु. ४६६०<br>रु. ४६६०/२० लाभार्थी = २३३.२० | २३३ | ४६६० | ४६६० |
| Variable Cost (as per actual present trainee) | | | | |
| २ | पायाभूत सुविधा<br>(Infrastructure facility) | १५० | ३००० | ४५०० |
| ३ | प्रशिक्षण साहित्य, माहिती पुस्तिका व इतर खर्च जसे नोट पॅड व पेन ई. | ९९ | १९८० | २९७० |
| ४ | अल्पोपहार व जेवण | २०० | ४००० | ६००० |
| ५ | लाभार्थी देय रक्कम<br>(Beneficiary Pay Out) | २१० | ४२०० | ६३०० |
| **एकूण खर्च** | | **८९२** | **१७८४०** | **२४४३०** |

- बीज भांडवल प्राप्त लाभार्थींचा TA/DA खर्च रु. २५० प्रती दिवस देय राहील.
- MT/DLT/SRLM/SULM तज्ज्ञांसाठी TA/DA (इतर जिल्ह्यातून प्रवास करत असल्यास):
  - अ. रुपये १५०० पर्यंत प्रवास खर्च (जाणे - येणे)
  - आ. प्रति दिन भत्ता: टियर - I शहरांसाठी रु २०००, टियर - II शहरांसाठी रु १५०० आणि टियर - III शहरांसाठी रु. १२००

- रु. २१० प्रती लाभार्थी देय रक्क्म (Pay Out) हा १ दिवसा साठी देणे बंधनकारक राहील.
- लाभार्थी देय रक्कम (Pay Out) PFMS प्रणाली द्वारे देणे बंधनकारक राहील.
- वरील तक्त्यातील अनु. क्र. १ मधील रकमा ह्या २० प्रशिक्षणार्थीसाठी प्रति बॅचसाठी Fixed राहतील. तसेच अनु. क्र. २,३,४,५ व ६ मधील रकमा प्रशिक्षणार्थ्यांच्या उपस्थित संख्येनुसार बदलतील.
- बीज भांडवल प्राप्त लाभार्थींना प्रशिक्षण हे एकदाच घेता येईल.

प्रशिक्षण संस्थेची (DLTI/TP) कार्य व जबाबदारी

१. प्रशिक्षण संस्था (DLTI/TP) लाभार्थी प्रशिक्षणासाठी online पोर्टलवर बॅच तयार करेल, तयार केलेल्या बॅचमध्ये लाभार्थीचा समावेश करतील (जिल्हास्तरीय समितीने शिफारस केलेले आणि बीज भांडवल प्राप्त) तसेच प्रशिक्षणार्थींचे तपशील, प्रशिक्षण वेळापत्रक, DLT चे नाव इ बाबी SNA कडे बॅच मान्यतेसाठी (Batch Approval) सबमिट करेल. SNA ने मंजूर केलेल्या बॅचनुसार प्रशिक्षण आयोजित करणे बंधनकारक आहे.

२. आयोजित करण्यात आलेली कोणतीही प्रशिक्षण बॅच रद्द झाल्यास किंवा पुढे ढकलल्यास, प्रशिक्षणार्थी आणि SNA यांना कार्यक्रम पुन्हा शेड्यूल (Reschedule) कळविणे ही प्रशिक्षण संस्थेची (DLTI/TP) ची जबाबदारी राहील.

३. प्रशिक्षण संस्था (DLTI/TP) हे सुनिश्चित करेल की लाभार्थी प्रशिक्षणची बॅच ही किमान २० आणि कमाल ३० प्रशिक्षणार्थीची असेल व बॅच पूर्ण होण्यासाठी वाढीव १० लाभार्थी यांना संपर्क करणे आवश्यक असेल.

४. सुधारित क्षमता बांधणी मार्गदर्शक सूचना दि. ०२.०९.२०२२ नुसार प्रशिक्षण संस्था लाभार्थी प्रशिक्षणासाठी विहित अभ्यासक्रमाचा वापर करतील व प्रशिक्षणाचा नमूद किमान विहित कालावधी कमी करणार नाही.

५. प्रशिक्षण संस्था योजनेच्या प्रशिक्षणा संदर्भात एक अधिकारी (Single Point of Contact) (नाव, ईमेल, लँडलाइन व मोबाइल नंबरसह) नामांकित करेल, जो प्रशिक्षणा संबंधित वेळापत्रक, बॅच तयार करणे, बॅचला मान्यता, लाभार्थ्यांची माहिती, प्रशिक्षणा संबंधित सर्व कागदपत्रे (Formats/Annexures) व तपशील (Reports), बिलाचे तपशील ई बाबी वेब -आधारित माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) पोर्टलवर ऑनलाईन सादर करतील.

६. प्रशिक्षण संस्था संबंधित जिल्हा नोडल अधिकारी यांच्याशी समन्वय साधून माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) पोर्टलवर ऑनलाईन सादर केलेली माहिती व मासिक प्रगती अहवाल (MPR) SNA ला सादर करतील.

**राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) यांचे कार्य भूमिका**

- जिल्हास्तरीय प्रशिक्षक (DLT), जिल्हा संसाधन व्यक्तीं (DRP) तसेच योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी असलेले कृषी व संलग्न विभागातील जिल्हा व राज्यस्तरीय शासकिय अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करणे.
- जिल्हा संसाधन व्यक्तींना वेळोवेळी सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजकांना सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याकरिता मार्गदर्शन प्रदान करणे.
- सर्व जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था (DLTI) व प्रशिक्षण भागीदारी संस्था (TP) यांच्याशी समन्वय साधून लाभार्थी प्रशिक्षणाचे (DLC Recommended and Seed Capital SHG Beneficiary) वार्षिक नियोजन (Trainining Calender) तयार करणे व सनियंत्रण करणे. तसेच याबाबत SNA ला माहिती सादर करणे.
- सर्व जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था (DLTI) व प्रशिक्षण भागीदारी संस्था (TP) यांच्याशी समन्वय साधून लाभार्थी प्रशिक्षाणा संदर्भातील माहिती प्रशिक्षण (MIS) पोर्टलवर niftem-t.ac.in ला ऑनलाईन Update करणे व मासिक प्रगती अहवाल (MPR) SNA ला सादर करणे.
- जिल्हानिहाय लक्षांकानुसार लाभार्थी प्रशिक्षणाचे वार्षिक प्रशिक्षण दिनदर्शिका तयार करणे.
- सर्व जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था (DLTI) व प्रशिक्षण भागीदारी संस्था (TP) यांची लाभार्थी प्रशिक्षणा संदर्भात बैठक आयोजित करणे.
- राज्यस्तरीय तांत्रिक संस्थाचे (SLTI) प्रकल्प आराखडा (PIP) तयार करणे.
- SNA द्वारे क्षमता बांधणी घटकासाठी राज्य प्रकल्प आराखडा (PIP) तयार करताना इनपुट प्रदान करणे.
- Incubation Centre प्रस्तावांना शिफारशी देणे.
- योजनेच्या ब्रँडिंग आणि मार्केटिंग घटकासाठी व प्रस्तावांवर तसेच तयार केल्या जात असलेल्या ब्रँडिंग आणि मार्केटिंग उपाययोजनांसाठी SNA ला इनपुट प्रदान करणे.
- **लाभार्थी प्रशिक्षणाचे सनियंत्रण करून लक्षांक पूर्ण करणे.**

**Annexure - I**

Time Line for completion DLT & DRP Training under PMFME

| Sr. No. | Actions to be Done | Time Limit | Responsibility |
|---|---|---|---|
| 1 | **Batch Creation**<br>for DLT & DRP | 8-10 days before | SLTI |
| 2 | **Addition of participants**<br>into batch created | 8-10 days before | SLTI |
| 3 | **Nomination**<br>of participants to batch | On the 1st day of training | SLTI |
| 4 | **Approval of batch** | Before the schedule training or on the 1st day of training | SNA |
| 5 | **Demand of funds**<br>for conduction of training DLT & DRP | 8-10 days before | SNA |
| 6 | **Fund release**<br>to concern SLTI | Before the Training | SNA |
| 7 | **Assessment**<br>of DLT & DRP training with upload of attendance on portal | | FICSI |
| 8 | **Submission**<br>of attendance report to SNA | conclusion day of Training | Training Coordinator, SLTI |
| 9 | **Status updation**<br>for marking attendance (Present/Absent) on portal | Conclusion day of Training | SLTI |
| 10 | **Declaration**<br>regarding completion of beneficiary training program | After completion of training | Training Coordinator, SLTI |
| 11 | **Demand for funds**<br>(if advance payment is not given) | Within 7 days of conclusion of Training | Concern DLTI/TP/SLTI |
| 12 | **Actual expenditure**<br>incurred by DLTI/TP/SLTI | 8 days after funds release | Concern DSAO/SAO/SNA |
| 13 | **Preparation**<br>of training report as per the actual expenditure incurred with all vouchers | | Training Coordinator, SLTI |
| 14 | **Status updation**<br>a. Upload the declaration format for the batch with participant's attendance sheet attested by Training Coordinator SLTI<br>b. Upload the assessment report<br>c. Upload a brief report on the program conducted including participation of the trainees<br>d. Upload soft copies of the photographs of the programme<br>e. Total expenditure of the batch<br>f. Upload the statement showing actual expenditure incurred in conducting the training program. | Within 3 weeks post completion of training | Training Coordinator, SLTI |

**Annexure - II**

Time Line for completion of Beneficiary Training under PMFME

| Sr. No. | Actions to be Done | Time Limit | Responsibility | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | **Batch Creation**<br>DLC Recommended and Seed Capital SHG beneficiary with batch ID | 8-10 days before Training | Concern DLTI/TP/SLTI | |
| 2 | **Addition of Beneficiary** into created batch (respective batch ID) | 8-10 days before Training | Concern DLTI/TP/SLTI | |
| 3 | **Spot addition**<br>of Beneficiary to batch ID | On the 1st day of training | Concern DLTI/TP/SLTI | incase of absent or new comer beneficiary of DLC Recommended and Seed Capital |
| 4 | **Approval**<br>of batch | Before the training | SNA | |
| 5 | **Advance demand**<br>of fund for conduction of training to concerned DNO/DSAO/SNA | 8-10 days before training | Concern DLTI/TP/SLTI | As per OM Dated 02.09.2022 **Annexure V** |
| 6 | **Fund release**<br>to concern DLTI/TP/SLTI | Before the Training | Concern DNO/DSAO/SNA | |
| 7 | **Conducution of Training** | | | |
| | a. Training of DLC Recommended beneficiary | 24 hrs / 3 days | DLTI/TP/SLTI | As per OM Dated 02.09.2022 syllabus and training will be given by certified DLT/MT and Experts |
| | b. Training of Seed Capital SHG beneficiary | 08 hrs / 1 day | DLTI/TP/SLTI | |
| 8 | **Assessment**<br>of beneficiary training | On the commencement and conclusion day of Training | Concern Training Coordinator, SLTI / DNO along with DRP | |
| 9 | **Submission**<br>of jointly signed (DNO and DLTI) attendance report to SLTI | Conclusion day of Training upto 12 PM | DNO and DLTI | |
| 10 | **Status updation**<br>for marking attendance (Present/Absent) and auto generated certificate on portal | Conclusion day of Training before 05 pm | SLTI | |
| 11 | **Download and Distribution** | Conclusion day of Training (5 to 6 | Concern DLTI/TP/SLTI | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | of Certificate to Beneficiary | PM) | | |
| 12 | **Signed copy of Declaration** regarding completion of beneficiary training program | Conclusion day of Training | Concern DLTI/TP/SLTI and DNO | |
| 13 | **Signed copy of Assessment** report of Beneficiary training | After completion of training | Concern DLTI/TP/SLTI and DNO | |
| 14 | **Demand for funds**<br>(if advance payment is not given) | Within 7 days of conclusion of Training | Concern DLTI/TP/SLTI | |
| 15 | **Actual expenditure**<br>to be incurred by DLTI/TP/SLTI | 8 days after funds release from concern authority | Concern DLTI/TP/SLTI | |
| 16 | **Preparation**<br>of training report as per the actual expenditure incurred with all vouchers | 8 days after funds release from concern authority | Concern DLTI/TP/SLTI | |
| 17 | **Uploading on the portal (Annexures)**<br>a. Declaration of Training program with attendance sheet – **Annexure-III**<br>b. Training Assessment Report - **Annexure-IV**<br>c. Content of Training report including statement of total expenditure incurred - **Annexure-v**<br>d. All Invoices of expenditure incurred - **Annexure-VI** | Within 3 weeks post completion of training | Concern DLTI/TP/SLTI in coordination with DNO | All the reports of conducted training must be uploaded on the Training Portal by DLTI/TP/SLTI and must be verified by the DNO |
| 18 | **Jointly signed**<br>(DLTI and DNO) Monthly Progress report of Expenditure & Training | On or Before 5th day of each Month | Concern DLTI/TP/SLTI in coordination with DNO | |

*लाभार्थी प्रशिक्षणाबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्हा नोडल अधिकारी व प्रशिक्षणसंस्थेतील प्राधिकृत अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीचा खर्चाबाबत व पोर्टलवरील कार्यवाहीबाबत दिलेल्या प्रपत्रामध्ये मासिक प्रगती अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.

प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत लाभार्थी प्रशिक्षणांचा भौतिक व आर्थिक लक्ष - साध्य अहवाल

सन २०२३ - २४

जिल्हास्तरिय प्रशिक्षण संस्था (DLTI)/ प्रशिक्षण भागीदारी संस्थाचे (TP) नाव - | जिल्हा -

| अ. क्र | प्रशिक्षणाचा लक्षांक | | बॅच आयडी | प्रशिक्षण कालावधी | प्रशिक्षणास उपस्थित लाभार्थी (संख्या) | प्रशिक्षण पोर्टलप्रमाणे प्रमाणपत्र दिलेले लाभार्थी (संख्या) | DLTI यांनी प्रशिक्षणास अग्रीम मागणी केली असल्यास तपशील | | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी अग्रीम रक्कम दिली असल्यास तपशील | | प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर DLTI/TP यांनी केलेल्या मागणीचा तपशील | | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मंजुर केलेली रक्कमेचा तपशील | | DLTI/TP यांनी प्रशिक्षणावर प्रत्यक्ष खर्च केलेली रक्कम रु. | DLTI यांचे कडे शिल्लक रक्कम | पोर्टलवर प्रपत्र अपलोड केल्याचा तपशील (Annexures १ -४) | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भौतिक (संख्या) | आर्थिक (लाखात) | | | | | पत्र क्र. व दि | रक्कम | पत्र क्र. व दि | रक्कम | पत्र क्र. व दि | मागणी रक्कम क्र. | पत्र क्र. व दि | मंजुर रक्कम | | | हजेरी अहवाल होय/ नाही | पुर्णत्वाचा दाखला होय/ नाही | असेसमेंट शीट होय/ नाही | प्रशिक्षण अहवाल होय/ नाही | खर्चाची प्रमाणके होय/ नाही | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| | अ | | जिल्हास्तरीय समितीने शिफारस केलेले लाभार्थी | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण (अ) | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | ब | | बीज भांडवल प्राप्त लाभार्थी | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण (ब) | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण (अ+ब) | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

| जिल्हास्तरीय प्रशिक्षण संस्था प्रतिनिधी नाव व स्वाक्षरी | जिल्हा नोडल अधिकारी यांचे नाव व स्वाक्षरी | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी नाव व स्वाक्षरी |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | |

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)

## सामाईक पायाभूत सुविधां (Common Infrastructure Facility)

## मार्गदर्शक सूचना सन २०२३-२४

## (VOCAL FOR LOCAL, LOCAL TO GLOBAL)

**सामाईक पायाभूत सुविधांसाठी सहाय्य:**

या घटकांतर्गत **शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) / शेतकरी उत्पादक कंपन्या (FPCs) / सहकारी संस्था / स्वयंसहाय्यता गट (SHGs) आणि त्यांचे फेडरेशन / शासकीय संस्था ज्यांनी सामान्य पायाभूत सुविधा / मूल्य साखळी / इन्क्यूबेशन केंद्रांसह अन्न प्रक्रिया साखळी (रांग) स्थापन केली आहे किंवा स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे असे प्रस्ताव कर्जाशी निगडीत आर्थिक सहाय्यासाठी पात्र असतील. ODOP किंवा नॉन-ODOP दोन्हीसाठीचे प्रस्ताव सहाय्यासाठी पात्र आहेत, तथापि ODOP प्रस्तावांना प्राधान्य दिले जाईल.**

**या योजनेअंतर्गत निर्मित सामाईक पायाभूत सुविधा तसेच सहाय्य केलेली प्रक्रिया साखळी (रांग) भरीव क्षमतेच्या प्रमाणात इतर सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना (Units) आणि लोकांसाठी (Public) व्यावसायिक स्वरुपात भाडे तत्वावर वापरण्यासाठी सेवा उपलब्ध असावी.** अशा प्रकल्पांची सहाय्यासाठी पात्रता ठरवित असतांना शेतकऱ्यांच्या कच्च्या मालाचे मूल्यवर्धन व सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग क्षेत्रास मिळणारा लाभ, व्यवहार्यता फरक (व्हायेबलिटी गॅप), खाजगी गुंतवणूकीची अनुपलब्धता, मुल्यसाखळीची गरज इ. बाबींचा विचार करुन निर्णय घेतला जाईल.

**अर्जदार संस्थेला पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५% बँक कर्जाशी निगडीत भांडवली अनुदान रक्कम रु. ३.०० कोटी कमाल मर्यादेसह प्रदान केले जाईल. पात्र प्रकल्प खर्चामध्ये यंत्रसामग्री आणि तांत्रिक बांधकामाचा खर्च समाविष्ट आहे, परंतु जमीन/भाडे किंवा भाडेपट्टीवरील शेडची किंमत वगळली आहे. तथापि, तांत्रिक बांधकाम पात्र प्रकल्प खर्चाच्या ३० % पेक्षा जास्त नसावे. अर्जदार संस्थेच्या किमान उलाढालीची आणि अनुभवाची कोणतीही पूर्वअट असणार नाही.**

**योजनेअंतर्गत सहाय्यासाठीच्या सामाईक पायाभूत सुविधा प्रकार :** या घटकांतर्गत खालील प्रकारच्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी सहाय्य केले जाईल.

अ) कृषि उत्पादनाची प्राथमिक प्रक्रिया, साठवणूक, वर्गवारी, प्रतवारी करण्यासाठी जागा व इमारत तसेच शेतीक्षेत्राच्या (Farm gate) जवळ शीतगृहाची उभारणी.

आ) एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनाच्या प्रक्रियेसाठी सामाईक प्रक्रिया सुविधा.

इ) **विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध असणारे केंद्र (इनक्युबेशन सेंटर):** या केंद्रामध्ये एका किंवा समान पध्दतीच्या अनेक उत्पादनांची हाताळणी केली जाईल.

लहान युनिटसना भाडेतत्वावर या केंद्राचा वापर त्यांच्या उत्पादनाची प्रक्रिया करण्यासाठी करता येईल. तसेच या केंद्राचा वापर काही प्रमाणात प्रशिक्षणासाठी सुद्धा होईल. हे केंद्र व्यावसायिक स्वरुपात भाडे तत्वावर देता येईल. - **इनक्युबेशन सेंटर मध्ये कमीत कमी २ ते ३ उत्पादन प्रक्रिया साखळी (रांग) आवश्यक.**

**कार्यपध्दती:**

योजने अंतर्गत या प्रकारच्या प्रस्तावांना निधी प्राप्त होण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब केला जाईल.

**अ)** योजनेअंतर्गत भांडवली गुंतवणूक व सामाईक पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी **निधी मागणीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) हा विहीत नमुन्यात तयार करावा. (सोबत- प्रपत्र-अ)**

आ) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये प्रकल्प खर्चाचा सविस्तर तपशील, आवश्यक मनुष्यबळ, आर्थिक उलाढाल, विपणन व्यवस्था, कच्च्या मालाची उपलब्धता, अंदाजित नफा-तोटा पत्रक, जमा-खर्चाच्या रोखीच्या प्रवाहाचे पत्रक इ. चा समावेश असणे आवश्यक.

**इ) अर्जदार संस्थेचे योगदान प्रकल्प खर्चाच्या किमान १० % असणे आवश्यक आहे. पोर्टलवर अर्ज करण्यापूर्वी, अर्जदार संस्थेने प्रकल्पासाठी कर्ज देणाऱ्या बँकेकडून तत्त्वत: मान्यता / पूर्व संमती सादर करणे आवश्यक आहे.**

**ई) केंद्र शासनाच्या** https://pmfme.mofpi.gov.in **या संकेतस्थळावर** विहीत नमुन्यात सविस्तर प्रकल्प अहवाल, अनिवार्य कागदपत्रे, प्रकल्प छायाचित्रे, दरपत्रके व बँक पूर्व संमती इ. सह परिपूर्ण अर्ज ऑनलाईन सादर करावा. प्रस्तावाची प्रत स्थळपहाणी अहवालासह जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचे स्वाक्षरीने SNA कार्यालयास पाठवुन द्यावी. स्थळ पहाणी स्वतः जि.अ.कृ.अ यांचे अध्यक्षतेखालील चमु अथवा त्यांचे मान्यतेने अधिनस्थ अधिकारी यांचा चमु करू शकेल. **सदर प्रस्ताव DRP/SNA द्वारे प्राथमिक छाननी होऊन राज्य कार्यकारी समिती / राज्यस्तरीय मंजूरी समितीने मंजूरी दिल्यानंतर राज्यस्तरीय नोडल यंत्रणा (SNA) सदरच्या प्रस्तावाची शिफारस Online Portal द्वारे संबधित वित्तीय संस्थेस कर्ज मंजूरीसाठी करेल.**

**उ)** वित्तीय संस्थेने कर्ज मंजूर केल्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट व सहकारी उत्पादक इ. यांना प्रति प्रकरण रु. ५०,०००/- चे सहाय्य दिले जाईल. **योजनेच्या या घटकासाठी जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) ला सहभागी करणे अनिवार्य नाही. अर्जदार संस्था सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचा अनुभव असलेल्या कोणत्याही व्यावसायिक संस्थेची मदत घेऊ शकते.**

ऊ) केंद्र शासनाचे परिपत्रक No.JS(MA)misc/१३५/२०२२,दिनांक ८/८/२०२२ नुसार प्रस्ताव मंजुरी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे इ. बाबतची माहिती सोबत सहपत्रित करण्यात आलेली आहे.

**Annexure-A**

**1. STRUCTURE OF DPR FOR COMMON INFRASTRUCTURE PROJECTS**
(TO BE FILLED BY THE BENEFICIARY ALONG WITH THE EXCEL INPUT SHEET OF DPR)

**GENERAL INFORMATION – BACKGROUND**

- Name of the applicant/agency (beneficiary) with complete address and contact details
- Type of Entity
- Line of Business/ Industry of the Entity
- Goals & Objectives
- Relevant Legal Information based on the form of the Entity- Bylaws, Board Members, Institutional Background,
- Details of Project Consultant

**PROFILE OF EXISTING BUSINESS OPERATIONS**

- Domain of Operation and its details
- Name & Location of the project
- Location Advantage
- Background of Current Business, Business Model
- Experience in implementation and operation of such Projects
- Total years of experience producing/manufacturing/trading the product, is it related to food processing industry? If yes, explain?
- Process description including the list of activities performed for value addition, if applicable
- Installed Capacity
- Details about the volumes
- SWOT Analysis (Strength, Weakness, Opportunities & Threats),
- Risk Analysis (Financial Risk, Trade Risk, Management Risk & Production Risk) of current business operation
- Linkages for existing and proposed business

**FINANCIAL BACKGROUND**

- Financial Performance of the entity
- Total Units Manufactured, Total Units Sold, Net Profit Generated in case of manufacturing/trading unit.
- Profitability Ratios, Working Capital Ratios, Leverage Ratios, Year-over-Year growth

**PROPOSED BUSINESS PLAN**

- **Rationale**
    - Need for the proposed business project? Criticality to the value chain of the major products in the region.
    - Operational Area of the Proposed Project
    - List of processes, activities to be done under the common infrastructure site
    - Whether new project or expansion/upgradation of an existing project. Please give details.
    - Proposed capacity of the Utility/Cold Storage/Warehouse etc. in MTs
    - Current status of private investment in the required infrastructure
- **Benefits to the general community**
    - Benefit expected to accrue to the farmers and Industry at large
    - Socio economic benefits (employment generation, upliftment of the growers/farmers) - Please quantify
    - Target beneficiaries/users and what benefit they will be accruing? Please quantify
    - Proposed Employment Generation prospects
    - Critical issues for the success of the project
- 
- **Revenue Model - Proposed Mode of Operation**
    - In case of leasing/renting, what type of revenue model. Revenue from

        - Entire or Partial facility (on rentals? Monthly Rent?)
        - Processing Plant or some machinery in the common infrastructure to be leased out?
    - Proposed capacity of material handling on hourly basis per day
- **Project Implementation**
    - Actual covered area on the main facility proposed to be built
    - Civil Work Details of the proposed project:
        - Land Development (Size, Area, Unit Cost, Number of Units, Cost)
        - Civil Work (Size, Area, Unit Cost, Number of Units, Total Cost)
        - Building (Size, Area, Unit Cost, Number of Units, Total Cost)
    - Plant & Machinery including Electricals, Plumbing and Water Supply for the proposed project (Technical Details, Capacity, Specifications, Unit Cost, Number of Units, Total Cost)
    - Other Fixed Assets (Technical Details, capacity, specifications, Unit Cost, Number of Units, Total Cost)
    - Whether premise self/lease/PPP or otherwise?
    - Implementation Schedule of the project
- **Viability/Benefits of the Proposed Project/ Business Plan**
    - Feasibility analysis of project based on technical, economic and financial aspects
    - Proposed Technology (sourcing & efficacy of the technology being used),
    - Price trend of raw material and output from similar industries for last 3 years
    - Production Cost per Unit, Per Unit Profit Estimate, Margins per Unit in case the common infrastructure is doing processing
- **Means of Funding of the total project cost**
    - **Sources of Funding** - In case if the applicant is the state govt. agency, whether the project has been approved/ submitted or under consideration by the concerned state Govt. Department or any Central Government Scheme for financial grant? If yes give details.
    - In case of funding from other sources also, please provide the details about the tie-up made so far with documentary proof.
    - Whether any appraisal has been done through financial institution, if yes, please provide the appraisal Note
- **Capability to fulfill Project Requirements**
    - Total Area of land in possession for the project
    - Whether the land on which the project is to be commissioned is free from all encumbrances and is in the possession of the agency. Please provide documentary evidence
    - Availability of cheap labor, adequate trained manpower, transport and other logistical facilities available in the local area.

## PROPOSED FINANCIALS

- **Project Cost Outlay**
    - Total Cost of the Project
    - Total Capital Cost
    - Profit and Loss Statements, Profitability Projections for the project for next 3 years
    - Working Capital Estimation,
    - Balance Sheets
    - Cash Flow Projections for next 3 Years
- **Profitability Ratios, Working Capital Ratios, Leverage Ratios, Financials Return Ratios -** Break-even point, Internal Rate of Return, Payback Period, Debt Service Coverage Ratio, Sensitivity Analysis, Year-over-Year growth.
- **Key Financial Details**
    - IRR (Internal Rate of Return)
    - NPV (Net Present Value)
    - Payback period
    - Minimum number of units to be sold to reach break-even point

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)

## ब्रँडींग व विपणन (Marketing & Branding)

## मार्गदर्शक सूचना सन २०२३-२४

## (VOCAL FOR LOCAL)

**ब्रँडींग व विपणन सहाय्य:**

सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये सहभागी शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट व सहकारी उत्पादक किंवा एस.पी.व्ही. (Special Purpose Vehicle - SPV) यांना या योजनेअंतर्गत मार्केटिंग व बॅन्डीग यासाठी सहाय्य केले जाईल. "एक जिल्हा एक उत्पादन" धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनासाठीच विभागीय किंवा राज्यस्तरावर ब्रँडींग व विपणनासाठी सहाय्य केले जाईल.

**सहाय्यासाठीच्या पात्र बाबी:**

अ) योजनेअंतर्गत विपणनाशी संबंधित प्रशिक्षणासाठी संपूर्ण निधी उपलब्ध केला जाईल.

आ) सामाईक ब्रँड व पॅकेजिंग विकसित करणे.

इ) राष्ट्रीय व विभागीय स्तरावरील किरकोळ विक्री साखळी व राज्यस्तरीय संस्थांशी विपणन करार.

ई) उत्पादनाचा अपेक्षित दर्जा राखला जावा याद्दष्टीने गुणवत्ता नियंत्रण.

ब्रँडींग व विपणाच्या दृष्टीने सहाय्य करण्यासाठी उत्पादनाचे सामाईक ब्रँड व सामाईक पॅकेजिंग निर्माण करणे व उत्पादनाचे प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. सामाईक ब्रँडींग व पॅकेजिंगसाठीची साजेशी गुणवत्ता / स्तर ही ठिकाण, उपक्रम व उत्पादन परत्वे वेगवेगळी असू शकते. हा स्तर जिल्हा, विभाग किंवा राज्यस्तर असावा याचा निर्णय राज्य नोडल एजन्सी घेईल. ब्रँडींग व पॅकेजिंगसाठी एकूण खर्चाच्या ५०% रक्कम सहाय्य म्हणून देय राहिल. यासाठीची कमाल निधी मर्यादा विहीत करण्यात येईल. या योजनेअंतर्गत किरकोळ विक्री केंद्रे सुरु करण्यासाठी सहाय्य दिले जाणार नाही.

**पात्रता निकष:**

प्रस्ताव सादर करत असताना खालील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे:

अ) प्रस्ताव "एक जिल्हा एक उत्पादन" धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनाशी संबधित असावा. **तथापि, केंद्र शासनाच्या OM No.FM/६/२०२१/FME-Part (१) दि.१०/१२/२१ नुसार**

I. शासकीय संस्था -: उत्पादनांच्या बास्केटमध्ये "एक जिल्हा एक उत्पादना" बाहेरील म्हणजेच NON ODOP उत्पादने तसेच भौगोलिक मानांकन प्राप्त केलेली उत्पादने यांचा समाविष्ट करु शकतात.

II. खाजगी संस्था -: राज्यातील नोंदणीकृत संस्था एकापेक्षा जास्त "एक जिल्हा एक उत्पादन" ची निवड करू शकते.

आ) मार्केटिंग व ब्रँडिंग या घटकासाठी कोणत्याही प्रकारच्या आर्थिक उलाढालीची अट नाही, तथापि, खाजगी संस्थांसाठी अर्जदाराने प्रस्तावातील योगदानाच्या समतुल्य निव्वळ मालमत्तेचे प्रमाण देणे आवश्यक आहे. जर अर्जदाराच्या योगदानाचा काही भाग मुदत कर्जाद्वारे असेल तर कर्जदार बँकेचे पुर्व संमती पत्र सादर करणे आवश्यक आहे आणि त्यानंतर अंतिम मंजूरी पत्र सादर करणे बंधनकारक आहे.

इ) अंतिम उत्पादन जे ग्राहकाला किरकोळ पॅकिंगच्या स्वरुपात विक्रीसाठी उपलब्ध असेल.

ई) अर्जदार शेतकरी उत्पादक संस्था / स्वयंसहाय्यता गट / सहकारी उत्पादक विभागीय किंवा राज्यस्तरीय एस.पी.व्ही. असेल जी मोठ्या प्रमाणात उत्पादक शेतकऱ्यांना एकत्र आणेल.

उ) उत्पादन व उत्पादक यांचा विस्तार व वाढ मोठ्या स्तरावर करणे शक्य होणार आहे.

ऊ) जी संस्था उद्योग उभारणी करणार आहे तिची व्यवस्थापन व उद्योजकीय क्षमता याबाबतचा तपशील प्रस्तावामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

ऋ) प्रस्तावित प्रकल्पाची किंमत ३ वर्षांच्या सरासरी अंदाजित उलाढालीच्या ५०% पेक्षा जास्त नसावी (ऐतिहासिक उलाढाल नसावी) त्यासाठी, प्रकल्पाचा किमान कालावधी खालीलप्रमाणे असावा:

a) शासकीय संस्था:- एक वर्ष

b) खाजगी संस्था:- कमीत कमी २ वर्षे, जिथे १ ला हप्ता खर्च केल्यावर (उपयोजित) सविस्तर प्रकल्प अहवालानुसार पहील्या वर्षातील प्रस्तावित उत्पन्न साध्य केल्यानंतर मार्गदर्शक सुचनानुसार दुसरा आणि तिसरा हप्ता देण्यात येईल.

ऌ) एखादी संस्था एकाच ब्रँड अंतर्गत वेगवेगळ्या उत्पादनांसाठी अनेक प्रस्ताव सादर करू शकते.

ऍ) तथापि, प्रस्तावांमध्ये खालील उप-घटकांतर्गत निधीची मागणी करता येणार नाही :-

- छपाईद्वारे जाहिरात करणे
- बाहेरील / घरा बाहेरील जाहिरात (Outdoor/Out of Home Advertising)
- रेडिओ जाहिरात

ऐ) खाजगी संस्थेच्या बाबतीत, पहिला प्रस्ताव यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर दुसरा प्रस्ताव सादर केला जाऊ शकतो.

**ब्रँडींग व विपणन सहाय्यासाठी अर्ज सादर करण्याची कार्यपध्दती :-**

**सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे:**

अ) सादर करावयाच्या प्रस्तावाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करीत असतांना त्यामध्ये आवश्यक तपशील जसे की प्रकल्पाचा तपशील, उत्पादन, कार्यपध्दती, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादनाचे एकत्रीकरण, सामाईक ब्रँडींग व पॅकेजिंग, किंमत निश्चिती कार्यपध्दती, उत्पादनाची प्रसिध्दी, गोदाम व साठवणूक, विपणन व्यवस्था (चॅनेल), विक्री वाढविण्यासाठीचे नियोजन इ. चा समावेश असावा.

आ) ब्रँडींग व विपणन प्रस्तावांसाठीचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी राज्य नोडल एजन्सी मार्फत मंजूर प्रस्तावांनाच जास्तीत जास्त रु.५ लाखापर्यंतचे सहाय्य उपलब्ध असेल.

इ) सदर प्रस्तावामध्ये कच्च्या मालाची खरेदी ते विक्री पर्यंत टप्प्याटप्याने हाती घ्यावयाच्या उपक्रमांचा तपशील, महत्वाच्या नियंत्रणाच्या बाबी, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादनाच्या जाहिरात व प्रचार-प्रसार संबंधी पुढील पाच वर्षांत राबवावयाचे उपक्रम, सहभागी होणाऱ्या उत्पादकांची संख्या व आर्थिक उलाढाल वाढवणे हा तपशील असावा.

प्रस्तावाच्या अंमलबजावणी संदर्भात एक करार केला जाईल ज्यासोबत व्यवसाय आराखडा जोडलेला असेल. सदरचा करार हा शेतकरी उत्पादक संस्था/स्वयंसहाय्यता गट/सहकारी उत्पादक /एस.पी.व्ही व प्रमुख खरेदीदार (असल्यास) व राज्यस्तरीय नोडल एजन्सी यांच्यामध्ये असेल. करारामध्ये उत्पादकांच्या भांडवल व सेवांच्या गरजा व त्यांच्या उत्पादनाची क्षमता आणि कौशल्य सुधार करण्यासाठी प्रस्तावित सुधारणा व बदल तसेच उत्पादकांची प्रमुख खरेदीदारांसोबत बाजार जोडणी अधिक बळकट कशाप्रकारे केली जाईल याचा तपशील असेल.

**केंद्र शासनाचे कार्यालयीन निवेदन क्र.FM-११/५५/२०२१ - FME दि.२७.०९.२०२१ अन्वये मार्केटिंग व ब्रॅन्डींग चे प्रस्ताव तयार करणेबाबत सुचना प्राप्त झाल्या आहेत. त्याची प्रत सोबत प्रपत्र ब नुसार जोडून सहपत्रित करण्यात येत आहे.**

प्रस्ताव सादर करताना संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / विभागीय कृषि सहसंचालक यांचेकडे पाठविण्यात यावेत व त्याची एक आगाऊ प्रत राज्य नोडल एजन्सीकडे माहितीसाठी पाठविण्यात यावी. सदरच्या प्रस्तावांची शिफारस संबंधित जिल्हा आदिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रस्तावाच्या उपयोगीतेबाबतचे अभिप्रायासह राज्य नोडल एजन्सीकडे करावी. राज्य नोडल एजन्सीकडून प्रस्ताव छाननी करून राज्य कार्यकारी समितीमार्फत राज्यस्तरीय मंजूरी समिती (SLAC) ला पाठविले जातील. तदनंतर राज्यस्तरीय मंजूरी समितीच्या (SLAC) शिफारसीने सदरचे प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविले जातील.